BVBK-0402416

वाचनालय
मा. क्रं.
२४९६
२५।५।९०

क्र. २४९६ दिनांक २५/५/९०
विभाग ७।१।

# पशूंचे संमेलन
(प्राणी कथा)

श्याम कुरळे

प्रयत्न प्रकाशन
औदुंबर

मी

कथा लिहून हाता वेगळी करताच आतुरतेने पहिल्या वाचकाचा मान पटकविणारी माझी कन्या

चि. प्रज्ञास

---

कथानुक्रम

सांग सांग भोलानाथ
हुरळलेली मेंढी
फितुर कोल्हा
जादूचे अस्वल
सुसरीणबाई तुझी पाठ मऊ
पशूंचे संमेलन
उतावीळपणाची सजा
उंदराचा हुकूमनामा
अहंकारी बेडूक
साप मुंगूस आणि जादूगार
कथा मानव प्राण्याची

प्रकाशक : सुरेन्द्रनाथ जगन्नाथ जोशी,
प्रयत्न प्रकाशन, औदुंबर, ता. तासगाव, जि. सांगली.

मुद्रक : रेनबो प्रिन्टर्स, 'राम-तारा अपार्टमेन्ट' ५६२ ई,
शाहूपुरी, व्यापारी पेठ, कोल्हापूर.

सर्वहक्क : श्याम कुरळे

मुखपृष्ठ : श्रीकांत हर्डीकर

मूल्य : दहा रुपये

# सांग, सांग भोलानाथ

एक होता नंदीबैलवाला. त्याच्याकडे एक नंदीबैल होता, तो अत्यंत आज्ञाधारक होता. मालकाच्या आज्ञेबाहेर तो कधीच जात नसे. मालक जसं शिकवील तसं शिकत असे. मालकाने त्याला नाना प्रकाराचे खेळ शिकवीले होते. नंदीबैलाचे ते खेळ व नृत्य दाखवून त्याचा मालक लोकांची खूप करमणूक करीत असे. नंदीबैलाला प्रेमाने तो भोलानाथ म्हणत असे. लोकांना खेळ दाखवून झाल्यावर शेवटी ढोलकीच्या तालावर गात तो मुलगा नंदीबैलास विचारीत असे—

'सांग; सांग, भोलानाथ, पाऊस पडेल काय ?'

त्या मुलग्याचा प्रश्न कानी येताच नंदीबैल होकारार्थी मान हलवत असे. नंदी बैलाने मान हलवताच तो मुलगा आनंदाने ओरडून लोकाना सांगत असे—

'होय होय. मायबाप, पाऊस पडेल छान ! पाऊस पडेल छान!,

त्या अपेक्षित उत्तरावर खूष होऊन लोक नंदीबैलाच्या मालकास पैसे, धान्य, जुनेपाने कपडे व अन्नही देत असत. त्यावर त्या नंदीबैलवाल्याच्या कुटुंबाचा चरितार्थ चालत असे, त्यामुळे तो नंदीबैलाची चांगलीच देखभाल ठेवत असे. त्याला उत्तम खुराक खायला देऊन नेहमी धष्टपुष्ट ठेवण्यासाठी धडपडत असे. स्वच्छ पाण्याने रोज धुऊन रंगीत झूल, रेशमी गोंडे. चाळ, कवड्यांच्या माळा वगैरे साधनांनी चांगला सजवत असे.

एके दिवशी भोलानाथाला असाच सजवून नंदीबैलवाला व



BVBK-0402416

त्याचा मुलगा एका गावी खेळ दाखविण्यासाठी चालले होते. त्या गावची वाट एका घनदाट जंगलातून जात होती. त्या वाटेने बरेच अंतर चालून गेल्यावर ते एका ओढ्याकाठी आले. चालून चालून ते खूप थकले होते. शिवाय त्याना भूकही फारच लागलेली होती. त्यामुळे ते त्या ओढ्याकाठी थांबले.

भोलानाथाला जंगलात चरण्यासाठी सोडून नंदीबैलवाल्याने व त्याच्या मुलग्याने ओढ्याकाठी बसून भाकर खाल्ली. ओढ्याचे स्वच्छ व थंडगार पाणी पोटभर प्याले. थोडा वेळ विश्रांतीसाठी एका झाडाखाली झोपले. थकल्यानंतर पोटभर जेवण झाल्यामुळे त्याना अगदी गाढ झोप लागली.

इकडे भोलानाथ चरत चरत बराच दूर गेला. तिथे त्याला बरेच पशू भेटले. भोलानाथला पाहताच ते उपहासाने हसू लागले. आपले काय चुकले ते भोलानाथला कळेना. त्यामुळे सर्वांना उद्देशून विनयाने त्याने विचारले, 'का रे बाबांनो. का हसता ? माझं काय चुकलं ?' भोलानाथचा प्रश्न ऐकताच एक माकड खट्याळपणे म्हणाले, 'भोलानाथ, मनुष्य प्राण्याला खूष करण्यासाठी कोणत्याही प्रश्नाच तू होकारार्थीच उत्तर देतोस. स्वतःला न पटताही दुसऱ्यांना खूष करण्यासाठी त्यांच्या प्रश्नावर होकारार्थी मान हलविणाऱ्या प्राण्याला मनुष्यप्राणी 'नंदीबैल' म्हणतो. तुझा हा अपमान तुला कळत नाही का ? की कळूनही तू लबाडी करतोस ?' 'यात लबाडी कसली ?'

भोलानाथच्या भाबड्या प्रश्नावर तुच्छेतेने एक अस्वल म्हणाले.

'अरे मूर्खा, गेली कित्येक वर्षे वेळेवर पाऊस पडत नाही

पडला तर फारच थोडा पडतो, त्यामुळे अलिकडे वारंवार दुष्काळ पडतो. हे माहित असूनही मानवाच्या 'पाऊस पडेल काय ?' शेती पिकेल काय ?' 'सुख मिळेल काय ?' अशा सारख्या प्रश्नांवर होकारार्थी मान का हलवतोस ? लोकांना आणि तुझ्या मालकाला खूष करण्यासाठीच ना ? '

अस्वलाच्या बिनतोड प्रश्नावर भोलानाथने होकारार्थी मान हलवताच पशूंमध्ये पुन्हा हास्याची जोरदार लाट उसळली. त्यामुळे भोलानाथ फारच गोंधळून गेला. त्याची ती केविलवाणी अवस्था पाहून त्याला सहानुभूती दाखवत एक गाढव म्हणाले. ' भोलानाथ, जग हे असंच आहे बाबा. भोळ्या भाबड्या प्राण्यांना मूर्ख ठरविण्यासाठी हुषार प्राणी नेहमीच टपून बसलेले असतात तू आज्ञाधारक आणि प्रामाणिक आहेस. तुझ्या मालकानं त्याला हवं तसं शिक्षण तुला दिलं. पण ते शिक्षण अपूर्ण आहे. त्यात तुझ्या खऱ्या मताचा विचारच केलेला नाही. त्यामुळे तू त्याच्या ' हो ला हो ' म्हणतोस. त्यामुळे सर्वजण तुला 'नंदीबैल' म्हणून हिणवतात, तुला याची खंत वाटत असेल तर यापुढ तू स्वत;च्या बुद्धीचा वापर करून प्रश्नांची उत्तरे द्यायला शीक.' गाढवाच्या विधानावर भाबडेपणाने शंका घेत भोलानाथ म्हणाला,

' गाढवादादा. बुद्धीचा वापर करुन मी दिलेलं उत्तर माझ्या मालकाला आवडलं नाही, तर तो रागवेल ना माझ्यावर ? ' बिचाऱ्या नंदीबैलाच्या भाबड्या व भित्रेपणाचा राग अनावर झालेला एक वाघोबा डरकाळी फोडीत म्हणाला,

' अरे भ्याडा. खरं बोलण्याची तुझ्यात हिंमत नाही म्हणून तुला नंदीबैल म्हणतात. कुणाच्याही रागा–लोभाची तर. तमा न बाळगता छाती ठोकपणं जो खर तेच बोलतो, तोच खरा

हिंमतवान. अशी हिंमत दाखवणं तुझ्या सारख्या ऐतखाऊला कदापि शक्य होणार नाही. स्वतःचं मन आणि मत विकलेला लाचार प्राणी तू ! तुझं तोंडही पाहण्याची आमची इच्छा नाही. चल, नीघ आमच्या समोरुन ! '

वाघाने केलेली निर्भत्सना ऐकताच शरमेने मान खाली घालून भोलानाथ माघारी वळला. इकडे त्याचा मालक व मालकाचा मुलगा झोपेतून उठून ताजे तवाने झाले होते. जवळपास भोलानाथ दिसत नसल्याचे पाहून ते अगदी हवालदिल झाले होते. इतक्यात भोलानाथ दुरून येताना त्याना दिसला. धावतच ते त्याच्याजवळ गेले. प्रेमाने त्यांनी त्याच्या पाठीवरुन हात फिरवले. त्या हाताच्या स्पर्शाने नेहमीच पिसासारखे हलके बनणारे भोलानाथचे मन आज जणु जड शीळच बनले होते, कशातच ते रमत नव्हते. त्याला उदासहताश वाटत होते. एक प्रकारची मरगळ आलेली होती. मालकामागून रस्त्याने चालताना तो सारखा विचार करीत होता. स्वतःवरील भ्याडपणाचा कलंक कसा पुसला जाईल या विषयीच त्याला रूखरुख लागून राहिली होती. बराच वेळ विचार केल्यावर मनाचा एक पक्का निर्धार झाला होता. त्या निर्धाराने त्याला एक नवीच उभारी लाभली होती. त्यामुळे मोठ्या उत्साहाने तो मालकामागून एका गावात आला होता.

त्या गावात नेहमीचे सर्व खेळ झाले. भोलानाथाने त्या खेळात नेहमीपेक्षा अधिकच उत्साह दाखवला. प्रेक्षक तर खूष झालेच पण भोलानाथचा मालकही खूष झाला. शेवटचा महत्वाचा खेळ दाखविण्यासाठी मालकाचा मुलगा रिंगणात उतरला ढोलकीच्या तालावर गात–नाचत त्याने विचारले,

' सांग, सांग, भोलानाथ पाऊस पडेल काय ? '

या वेळी निर्धारपूर्वक नेहमीची सवंय सोडून भोलानाथाने चक्क नकारार्थी मान हलवली !

भोलानाथाच्या त्या अनपेक्षित कृतीने त्याचा मालक व मालकाचा मुलगाही गोंधळून गेला. कुणालाच काही सुचेना.

मालकाचा मुलगा पुन्हा:पुन्हा पावसासंबंधी प्रश्न विचारीत होता व भोलानाथ पूर्वीच्याच निर्धाराने पुनःपुन्हा नकारार्थी मान हलवत होता. मालकाने भोलानाथची पाठ चाबकाने फोडून काढली, पण भोलानाथने शेवटपर्यंत आपला निर्धार सोडला नाही. ' जनावर असे कसे बिथरले ? ' असा विचार करीत भोलानाथच्या मालकाने त्या गावातून पळ काढला.

पुढे प्रत्येक गावातूनच पळ काढण्याची वेळ येऊ लागली. भोलानाथचा मालक खूप संतापला.त्याने भोलानाथचा खुराक बंद केला तरीही भोलानाथच्या वर्तनात काही फरक पडला नाही. दिवसेदिवस भोलानाथाच्या मालकाची परिस्थिती खालावू लागली भोलानाथाची तब्येत तर फारच खालावली. आता हे निरूपयोगी जनावर ठेवून काय उपयोग ? एखाद्या कसायाला विकले तर चार पैसे तरी पदरी पडतील. असा त्याने व्यावहारिक विचार केला. मालक आपल्याला कसायाला विकणार व कसाई आपली कत्तल करणार हे भोलानाथला कळून चुकले होते. तरीही भोलानाथ मुळीच विचलीत झाला नव्हता. मालकाचा मुलगा मात्र खूप हळहळत होता. त्याच्या आवडत्या भोलानाथला कसायाच्या हाती देणे ही कल्पनाच त्याला सहन होत नव्हती. पण बापाच्या निर्णयापुढे त्याचे काही चालत नव्हते.

एके दिवशी भोलानाथचा मालक भोलानाथास घेऊन निघाला. त्याच्यां मागून त्याचा मुलगाही जड अंत:करणाने चालू लागला. एका गावात आल्यावर भोलानाथचा शेवटचा खेळ दाखवावा

अशी त्या मुलग्याची इच्छा झाली. त्याच्या इच्छेनुसार भोलानाथच्या मालकाने त्या गावात खेळ दाखवला शेवटी त्या मुलग्याने दु;खी अंत करणाने म्हटले,

'सांग,सांग भोलानाथ पाऊस पडेल काय ?'

मुलग्याच्या प्रश्नामुळे भोलानाथच्या डोळ्यातून टप टप अश्रु गळू लागले मान मात्र नाकारार्थीच हलू लागली. तेव्हा कळवळून तो मुलगा म्हणाला,

'अरे बाबा स्वत;ला आणि मलाही का छळतोस ? पाऊस पडेल म्हण ना ?'

त्या मुलग्याच्या विधानावर एक अनुभवी म्हातारा म्हणाला,

'अरे बाळ, ते मुकं जनावर असलं तरी त्याला सारं कळतं. माणसं बेछूटपणे जंगलाची तोड करीत सुटली आहेत. खरं तर झाडांमुळच पाऊस पडतो. ती झाडंच तोडल्यावर पाऊस कसा पडेल ? आणि पाऊस पडणारच नसेल तर तुझा भोलानाथ मान कसा हलवील ?'

म्हाताऱ्याच्या स्पष्टीकरणावर गंभीर होत भोलानाथला उद्देशून त्या मलग्याने विचारले'

'भोलानाथ आजोबा म्हणतात ते खरे आहे काय ?'

भोलानाथने चक्क होकारार्थी मान हलवळी.

मुलग्याने पुन्हा विचारले,

'झाडे लावल्यावर पाऊस पडेल काय ?'

यावेळी तर होकारार्थी मान हलवीत भोलानाथ आनंदाने नाचूही लागला. मुलग्याला अतिशय आनंद झाला आणि तोही भोलानाथ समवेत नाचू लागला. आपलं जनावर पुन्हा ताळ्यावर आल्याच्या समाधानात भोलानाथचा मालकही आनंदाने नाचू लागला. पाऊस पडण्याचं रहस्य कळल्यामुळे त्या गावचे लोकही समाधानाने नाचू–गाऊ लागले.

# उतावीळपणाची सजा

एक घनदाट जंगल होतं. त्या जंगलात सर्व प्रकारचे पशू राहत होते. सिंह त्यांचा राजा होता. त्याने कोल्हेबन, लांडगेबन, वाघराई, सांबर पठार, ससेकुरण असे जंगलाचे अनेक विभाग केलेले होते. त्या त्या विभागात त्या त्या प्रकारचे पशू राहात असत. दुर्बल पशूंच्या संरक्षणासाठी त्यांच्याहून सबल असलेले पशू पहारा करीत असत.

ससे बनात हजारो ससे होते. त्यांच्या संरक्षणासाठी एका गाढवाची नेमणूक केलेली होती. धोक्याच्या वेळी ते गाढव मोठ-मोठ्याने ओरडत असे. त्याच्या ओरडण्याच्या इशाऱ्यामुळे सावध झालेले ससे सुरक्षित ठिकाणी पळून जात असत.

त्या जंगलापासून थोड्याच अंतरावर दुसरे एक जंगल होते, त्या जंगलातील एक कोल्हा सशाच्या कोवळ्या लुसलुशीत मांसाला चटावलेला होता. तो राहात असलेल्या जंगलातील सर्व ससे त्याने खाऊन फस्त केलेले होते. त्यामुळे या जंगलातील ससेबनाकडे त्याने मोर्चा वळविलेला होता.

ससेबनातील गाढव अत्यंत प्रामाणिक होते. त्याच्यावर सोप-विलेले काम पार पाडण्यासाठी ते नेहमी सावधपणे टेहळणी करीत

असे. दुसऱ्या जंगलातून येणारा तो कोल्हा गाढवाच्या सावध नजरेतून कधीच सुटत नसे. कोल्हा दिसताक्षणीच गाढव मोठ–मोठ्याने ओरडू लागे. तो धोक्याचा इशारा कानी येताच ससे सुरक्षित ठिकाणी लपून बसत. मग आपण सशाची शिकार करण्याच्या उद्देशाने आलोच नव्हतो अशा अविर्भावात तो कोल्हा आपल्या जंगलाच्या दिशने निघून जात असे. मनातून मात्र तो फारच निराश–हताश झालेला असे. सशांची शिकार करण्यामध्ये अडसर ठरलेल्या त्या कर्तव्यदक्ष गाढवाचा काटा कसा काढावा या विषयी तो कोल्हा सारखा विचार करीत असे.

एके दिवशी विचार करता करता त्याला एक युक्ती सुचली. त्या युक्तीवर खूष होऊन तो ससेबनाच्या दिशेने निघाला. त्याच्या येण्याची चाहूल लागताच सशांना सावध करण्यासाठी गाढव मोठमोठ्याने ओरडू लागले. तो इशारा मिळताच ससेबनातील ससे क्षणार्धात दिसेनासे झाले. तरीही कोल्हा पुढे पुढेच येत असल्याचे पाहून गाढवाच्या मनात शंका आली. त्याला वाटले की कोल्हा त्याच्यावर आक्रमण करण्यासाठीच पुढे येत असावा. तेव्हा त्याला दटावीत गाढव म्हणाले,

'कोल्होबा, आणखी पुढे याल तर माझ्या लाथेच्या एकाच ठोकरीसरसे तुमच्या जंगलात जाऊन बेशुद्ध अवस्थेत पडाल !' गाढवाची धमकी ऐकून अगदी नम्रपणाचा आव आणीत कोल्हा म्हणाला,

'गर्दभराज, आपल्यावर आक्रमण करण्याची हिंमत माझ्यातच काय, पण अन्य कोणत्याही पशूत असणार नाही. आपणास आपल्या सामर्थ्याची जाणीव नाही, पण सर्व पशू आपले सामर्थ्य

जाणून आहेत. केवळ आपल्या कर्णभेदी गर्जनेने समस्त पशू-जगताचा थरकाप उडतो. सिंह वनाचा राजा असल्यामुळेच त्याच्या आरोळीला महत्व आहे. खरे तर आपल्या गर्जनेत जी जबरदस्त हुकूमत आहे, ती सिंहाच्या आरोळीत किंवा वाघाच्या डरकाळीत शोधूनही सापडणार नसल्यामुळे वनाचा राजा होण्याचा खरा मान आपलाच आहे. गर्दभराज !'

कोल्हयाने केलेली स्तुती ऐकून गाढव मनातून खूष झाले होते. वनाचा राजा होण्याची आपली पात्रता असूनही आपणास त्या सर्वोच्च पदापासून वंचित ठेवून आपल्या जंगलातील पशूंनी आपल्यावर घोर अन्याय केलेला आहे, असे त्याला वाटू लागले होते. त्यामुळे विषण्ण मुद्रेने ते म्हणाले,

'कोल्होबा, तुम्ही म्हणता ते मलाही पटतं, पण या जंगलाच्या राज्यात खऱ्या गुणाची पारख कोण करणार ? मी या जंगलाचा राजा होण्याच्या पात्रतेचा असूनही माझ्यावर या सशासारख्या गरीब आणि भित्र्या प्राण्याच्या संरक्षणाची जबाबदारी टाकण्यात आलेली आहे. हीच का माझ्या पात्रतेची कदर ? अहो, जिथं पिकतं तिथं विकत नसत हेच खरं !'

गाढवाच्या तोंडचे उद्गार ऐकताच आपली युक्ती सफल होत असल्याच्या आनंदात उत्साहाने कोल्हा म्हणाला,

'गर्दभराज, पिकतं तिथं विकत नसेल, तर ज्या ठिकाणी ते विकतं तिथं जाण्यातच खरा शहाणपणा आहे !'

'म्हणजे मी कुठं जावं म्हणता कोल्होबा ?'

गाढवाच्या भाबड्या प्रश्नावर कोल्हा धूर्तपणे म्हणाला,

'पशुराज, आपल्या गुणाची कदर करणारा, आपला एक निष्ठा-

वंत सेवक म्हणून मी आपणास विनंती करतो की, आपण निर्धास्तपणे आमच्या राज्यात यावं. आमच्या राज्यातील वनराज सिंह आसन्न मरण अवस्थेत पडलेला आहे. या क्षणापर्यंत कदाचित तो स्वर्गवासीही झाला असेल. त्यामुळे आमच्या वनातील सर्व प्राणी नव्या राजाच्या विवंचनेत आहेत आपल्या सारखा प्रतापी राजा मिळताच आमच्या वनातील सर्व पशु जगत धन्य होईल!'

धूर्त कोल्हयाच्या बोलण्याने मूर्ख गाढव अधिकच प्रभावित झाले. राजपदासाठी त्याचे मन अगदी उतावीळ झाल्यामुळे निमूटपणे ते कोल्हयामागून चालू लागले. कोल्हा नेईल तिकडे जाऊ लागले

बरेच अंतर चालल्यावर ते एका दगडाच्या खाणीजवळ आले. तेथे एक पाथरवट दगड फोडीत होता. बरेच दगड फोडून त्याने भला मोठा ढीग रचलेला होता. त्याच्या जवळ आल्यावर गाढवाने भाबडेपणाने कोल्हयास विचारले,

'कोल्होबा; हा तर पाथरवट दिसतो. तुम्ही मला या माणसाकडे कशासाठी आणले?'

गाढवाच्या प्रश्नावर कोल्हा धूर्तपणे म्हणाला,

'गर्दभराज, तुम्हाला राजपद हवे ना? हा पाथरवट तुम्हाला ते मिळवून देईल. आपण निःशंकपणे त्याच्याकडे जावे.'

कोल्हयाचे स्पष्टीकरण ऐकून राजपदासाठी उताविळ झालेले ते गाढव त्या पाथरवटासमोर जाऊन नम्रपणे उभे राहिले. फोडलेल्या दगडांचा ढीग कसा हलवायचा या विवंचनेत असलेल्या त्या पाथरवटास गाढवासारखा आयता चालून आलेला गरीब प्राणी सापडल्यामुळे त्याने त्याच्या पाठीवर दगडाच्या गोण्या

लादल्या व गावाच्या दिशेने हाकलत नेले. काम फत्ते झाल्याच्या आनंदात कोल्हा ससेबनाच्या दिशेने पळून गेला.

त्या दिवसापासून तो धूर्त कोल्हा निर्धास्तपणे सशांची शिकार करू लागला आणि राजपदासाठी उतावीळ झालेले गाढव दगडाच्या गोण्या वाहू लागले. पात्रता नसताना मोठेपण मिरवण्याची हाव धरल्याच्या उतावळेपणाची सजा अद्याप ते गाढव भोगतच आहे!

# हुरळलेली मेंढी

एक होता मेंढपाळ. त्याच्यांकडे मेंढ्यांचा मोठा कळप होता. रोज सकाळी तो रानात जात असे. त्यामागून कळपातील मेंढ्या निमूटपणे जात असत. रानातील खुरट्या गवतात त्या चरत. ओढ्यातील डबक्यात मिळेल तिथे पाणी पीत. सांयकाळी तो मेंढपाळ गावच्या दिशेने चालू लागे. मेंढ्यांचा कळपही त्याच्या–मागून परते.

त्या मेंढ्यांच्या कळपात एक भली मोठी मेंढी होती. इतर मेंढ्यांपेक्षा तिची ताकदही मोठी असल्यामुळे सर्वजण तिला वच–कून असत. मेंढ्याच काय पण मोठे मेंढेही सहसा तिच्या वाटेला जात नसत. त्या मेंढीला तिच्या या सामर्थ्याचा मोठा अभिमान वाटे.

मेंढ्यांच्या संरक्षणासाठी त्या मेंढपाळाने एक कुत्राही पाळलेला

होता. मेंढपाळ पुढे चाले. त्याच्यामागून मेंढ्यांचा कळप असे त्या कळपामागे संरक्षणासाठी कुत्रा असे. त्यामुळे रानातील कोल्ह्या-लांडग्यांना मेंढ्यांवर हल्ला करणे सहसा शक्य होत नसे. सायंकाळच्या वेळी तर मेंढ्यांना संरक्षणाची फारच आवश्यकता भासत असे. त्यासाठी सर्व मेंढ्या नेहमी कुत्र्याच्या पुढे पुढेच राहण्यासाठी धावपळ करीत असत. त्या सशक्त मेंढीला मात्र आपल्या संरक्षणासाठी आपल्यामागे कुत्रा असावा, या गोष्टीचा फार खेद वाटे. त्यामुळे बऱ्याच वेळा ती कुत्र्याच्या मागेच राहून तिला कुत्र्याचे संरक्षण देण्याची मुळीच गरज नसल्याचे भासवत असे. बिचाऱ्या कुत्र्याला मेंढीचा तो उद्दामपणा कळत होता. त्याचे तिला प्रायश्चित मिळावे असेही त्याला वाटत होते. पण त्याचा नाइलाज होता. धन्याचे नेमून दिलेले काम प्रामाणिक-पणे पार पाडण्यासाठी तो बांधला गेलेला होता. त्यामुळे मेंढीच्या उद्दामपणाकडे डोळेझाक करून तो नेहमी तिच्या मागून चाल-ण्याचा प्रयत्न करीत असे.

त्या रानात एक लांडगा होता. बऱ्याच दिवसापासून मेंढी मारून खाण्यासाठी तो टपून बसलेला होता. पण कुत्र्याच्या जागरुकपणामुळे त्याचा बेत काही तडीस जात नव्हता. त्यामुळे मनातून त्या प्रामाणिक कुत्र्यावर तो सारखा जळफळत असे.

एके दिवशी त्याला एक युक्ती सुचली मेंढ्यांचा कळप परतण्याच्या मार्गावरील एका दाट झुडुपात तो दबा धरून बसला, सायंकाळची वेळ होताच मेंढपाळ त्या परतीच्या वाटेवरून चालू लागला. त्याच्या मागून मेंढ्यांचा कळप चालू लागला. त्यामा-गून कुत्राही चालू लागला. ती सशक्त मेंढी मात्र मागे मागेच

रंगाळू लागली. असे करता करता ती लांडगा लपलेल्या झुडुपा– जवळ आली आलेली संधी साधून तो लांडगा त्या मेंढीला म्हणाला,

'ताई, ताई, जायची का घाई ? इतकी सशक्त तू–कुणाला भितेस ? त्या मरतुकड्या कुत्र्यापुढे मान का तुकवतेस ?'

लांडग्याचं बोलणं ऐकून मेंढी ताडकन उत्तरली,

'मी कुणालाही भीत नाही. या मरतुकड्या कुत्र्यापुढें मान तुकवण्याचा प्रश्नच नाही. तोच मेला सारखा माझ्या मागे मागे फिरतो.'

मेंढीच्या उत्तराने उत्तेजित झालेला लांडगा म्हणाला,

'ताई, खरं तर जंगलाची राणी होण्याची तुझी योग्यता. मग तू त्या मेंढपाळामागे आणि या कुत्र्यापुढे का धावतेस ?'

त्या लबाड लांडग्याच्या बोलण्यावर हताशपणे ती मेंढी म्हणाली,

'भाऊ तूच या जगात माझी योग्यता जाणणारा निघालास. बाकी कुणालाही माझी योग्यता कळत नाही. अशा परिस्थितीत मी काय करू ?'

मेंढीकडून अपेक्षित प्रश्न येताच लांडगा मनात खूष होऊन घाईघाईने म्हणाला,

'ताई, माझ्यावर विश्वास ठेव, आणि चल माझ्या मागून, मी तुला जंगलाची राणी करीन ! तिथं तुला मऊ लुसलुशीत गवत खायला मिळेल. स्फटिकासारखं स्वच्छ पाणी प्यायला मिळेल.'

लांडग्याच्या भूलथापा ऐकताच ती मूर्ख मेंढी क्षणाचाही विलंब न लावता त्याच्यामागून जायला उतावीळ झाली. त्या

प्रामाणिक कुत्र्याची नजर चुकवून ती मूर्ख मेंढी त्या लबाड लांडग्यामागून धावत सुटली. ज्या वेळी कुत्र्याने मागे वळून पाहिले त्यावेळी मेंढी सर्व शक्ती एकवटून लांडग्यामागे धावत असलेली त्याला दिसली. मेंढीच्या संरक्षणासाठी मागे धावत जाण्याचा विचार त्याच्या मनात येतो न येतो तोच लांडग्याने त्या मेंढीवर झडप घातली आणि दुसऱ्याच क्षणी तीक्ष्ण दातांनी मेंढीची गळघाटी तोडून तो तिच्या मानेचे लचके तोडू लागला. ते दृश्य पाहून तो कुत्रा खेदाने उद्गारला,

'हुरळलेली मेंढी—लागली लांडग्याच्या पाठी ! आता भोगू दे आपल्या कर्माची फळं !'

# उंदराचा हुकूमनामा

एक होता शिकारी. तो जंगली जनावरे जाळ्यात पकडीत असे. ती जनावरे सर्कसवाल्याना विकत असे. त्या पैशावर त्याचा उदरनिर्वाह चाले. असाच एकदा जंगलात जाळे लावून तो घरी गेला होता. त्या जाळयात एक सिंह सापडला होता. सुटकेसाठी तो सारखी धडपड करीत होता. जसजसा तो धडपड करीत होता, तसतसा त्या जाळ्यात अधिकच गुरफटला जात होता.

जवळच असलेल्या एका दरडीच्या बिळातून एक उंदीर त्या

सिहाची फजिती पहात होता. सिंह जाळ्यात पुरताच गुरफट– ल्याची त्याची खात्री झाली मग उंदराने समोरच्या पाचोळ्यावर टुणकन उडी मारली. पाचोळ्याचा आवाज झाला. शिकारी आला की काय, या भीतीपोटी सिंह घाबरला. भीतभीतच त्याने आवाजाच्या दिशेने पाहिले. समोर एक उंदीर दिसताच सिंहाला हायसे वाटले. त्या उंदराची विनवणी करीत सिंह म्हणाला,

उंदीरमामा, उंदीरमामा, त्वरा करा. जाळे कुरतडा भरा भरा. शिकारी येथे येण्याआधी जाळ्यातून आमची सुटका करा.'

वनराज सिंहाची विनवणी ऐकून त्याला कोंडीत पकडीत उंदीर उत्तरला,

'वनराज, थोडा धीर धरा. जाळे कुरतडीन भरा भरा, पण एक अट मान्य करा.'

अधिरतेने सिंह म्हणाला,

त्यावर धूर्तपणे उंदीर बोलला,

'आपण जरी वनराज असला, तरी ऐकावा माझाच सल्ला जिथवर आपलं राज्य असेल, तिथवर माझाच हुकूम चालेल. मंजूर असेल माझी अट, तर सुटका करीन झटपट.'

जीऽ हुजूर. आपली अट एकदम मंजूर !'

सुटकेसाठी कासावीस झालेल्या सिंहाने उंदराची अट मान्य करताच उंदराने ते जाळे कुरतडून त्यातून सिंहाची सुटका केली.

त्या दिवसापासून वनाच्या कारभारात उंदराचा हस्तक्षेप सुरु झाला. पशूंना जाचक असे अनेक हुकूमनामे उंदराने जाहीर केले. पशूंनी वनात मुक्तपणे फिरण्या–बागडण्यावर बंधने घातली गेली. त्यांच्या खाण्या–पिण्यावरही अनेक निर्बंध घातले गेले. त्यांचे

स्वातंत्र्य हिरावून घेतले जाऊ लागले.

वनाच्या कारभारात उंदराने चालवलेली ढवळाढवळ कुणालाही पसंत नव्हती. पण खुद्द वनाचा राजा सिंहच उंदराच्या आहारी गेल्यामुळे उघडपणे कुणीहीं उंदराला विरोध करु शकत नव्हते. उंदराच्या कारभाराविषयी सर्व पशूंच्या मनात अंसतोषच धुम–सत होता, पण सिंह उंदराच्या सल्ल्यानेच वागत असल्यामुळे सर्वजन उंदराची मर्जी सांभाळून स्वतःस त्याची सहानुभूती मिळ-विण्यासाठीच धडपडत असत. हत्ती सारख्या प्रचंड प्रांण्याचाही उंदरापुढे थरकाप उडत असे.

थोड्याच दिवसात उंदीर अगदीच बेताल बनला. सिंहालाही तो जुमानीनासा झाला. खरे तर उंदराची ही शिरजोरी सिंहालाही पंसत नव्हती, पण संकटकाळी उंदराने केलेल्या उपकाराच्या ओझ्याखाली दबून राहिल्यामुळे तो त्याला विरोध करू शकत नव्हता परिणामीं वनाच्या कारभरात उंदीर मन मानेल तसा धुमाकूळ घालू लागला. दिवसे दिवस पशूंना त्या वनात जगणे अगदी असह्य होऊ लागले.

एके दिवशी उंदराने अगदी कहरच केला. साप हे उंदराचे शत्रू असल्यामुळे त्यांच्या पासून उंदरांना होणारा धोका टाळ–ण्यासाठी त्याने असा हुकूमनामा जाहीर केला की–

'या वनातील सर्व सर्पांनी वनाबाहेर निघून जावे. आयत्या बिळात घुसण्याचा प्रयत्न करू नये. जे सर्प वनातून हद्दपार होणार नाहीत, त्यांचा मुंगसानी नाश करावा.'

उंदराचा नवा हुकूमनामा सर्पांच्या वनातील आस्तित्वावरच घाव घालणारा असल्यामुळे सर्प फारच घाबरले. या कठीण प्रसं–

गातून सुटका करून घेण्यासाठी चतुर कोल्हाच काहीतरी मार्ग सुचवील या आशेने ते कोल्याकडे आले.

वनाच्या कारभारातील उंदराच्या वर्चस्वामुळे कोल्हा मनातून उंदरावर सारखा जळफळतच होता. परस्पर त्याचा काटा काढ– ण्यासाठी संधीची तो वाटच पहात होता. सर्प त्याच्याकडे सल्ला विचारण्यासाठी येताच एका प्रचंड नागाला डिवचून कोल्हा म्हणाला,

'नागराज, केवळ आपल्या फण्याच्या दर्शनानं सर्व प्राणिमा– त्रांचा थरकाप उडविण्याचं सामर्थ्य आपल्यात असताना त्या क्षुद्र उंदराला आपण का भिता ? सर्प जातीच्या अस्तित्वावर त्यानं घाव घातला तरी सुस्तपणे आपण पहातच राहिलात या आपल्या सोशीक वृत्तीला काय म्हणावे ? माझ्या सारखा एखादा निर्भय प्राणी असता तर त्या उंदराचा चावून फन्ना उडवला असता !'

कोल्हयाने नागाचा स्वाभिमान डिवचून फूस देताच रागानं फुसफुसत फणा काढून फुत्कार सोडीत नाग म्हणाला,

'मी त्या क्षुद्र उंदराला एका दमात गिळू टाकीन !'

'मग थांबलात का ? या वेळी आपणास असंच शौर्य दाखवणं शोभून दिसेल. आम्ही सर्व पशू आपल्या कृतीचं कौतुकच करू.'

कोल्हयाने फूस देण्याचाच अवकाश, 'मी त्या नीच उंदराला कायमची अद्दल घडवीन !' असे रागाने फुत्कारतच तो प्रचंड नाग उंदराच्या शोधात निघाला.

त्या वेळी पशूंच्या सभेत वनराजा शेजारीच एका उच्चासना- वर उंदीर उर्मटपणे बसलेला होता. त्याला पहाताच नागाचा राग अनावर झाला. उंदराच्या दिशेने त्वेषाने फुत्कार टाकीत तो येऊ

लागला. आपल्याच खारोने तो प्रचंड नाग येत असल्याचे पाहून उंदराची भीतीने चांगलीच भंबेरी उडाली. 'वनराज मला वाचवाऽ वाचवा ऽऽ' अशी तो सिंहाची करुणा भाकू लागला. उंदराच्या उपकाराचा भार आपल्या डोक्यावरून उतरण्याची संधी चालून आल्याचे पाहून सिंह गर्जना करीत म्हणाला,

'अरे क्षुद्र उंदरा, या वेळी तुला मी जरुर वाचवू शकेन पण एका अटीवर–अट अशी की, यापुढे वनाच्या कारभारात मुळीच चालू देणार नाही तुझा तोरा. मंजूर असेल अट, तरच तुला वाचविण्याची करीन खटपट !'

'मंजूर ! मंजूर !!'

उंदराने वनराजाची अट मान्य करताच फुत्कारत नाग म्हणाला'

'अरे नीचा, वनराजाच्या इच्छेनुसार यावेळी मी तुला सोडीन पण माझीही एक अट तुला मान्य करावी लागेल. अट अशी की सर्प जातीच्या वनातील आस्तित्वावर घाला घालणारा तुझा तो दुष्ट हुकूमनामा तुला विना शर्त मागे घ्यावा लागेल.'

,मान्य. माझा हुकूमनामा मी बिनशर्त मागे घेत आहे.'

उंदराने नागाची अट मान्य करताच कोल्हे मिष्किलपणे उंदराला म्हणाला,

'उंदीरमामा, आता या उच्चासनावरुन उठा आणि आपल्या बिळाचा आश्रय घ्या, नाहीतर खवळलेला कोणताही हिंस्र पशू आपणास एका दमात गिळून टाकील.'

कोल्हयाचं बोलणं खरंच वाटून उंदराने उच्चासनावरुन टुण–कन उडी घेतली आणि जीवाच्या आकाताने धावत जाऊन एका बिळात लपला. उंदराची झालेली फजिती पाहून एक गाढव मोठ-

मोठ्याने हसत सुटले. मग त्या वनात बराच वेळ मुक्त हास्याची खमखस पिकत राहिली.

●●

# फितुर कोल्हा

एका जंगलात रोज एक शिकारी येत असे अनेक प्राण्यांची अचूकपणे तो शिकार करीत असे. त्याचा हा दिनक्रम कित्येक दिवसापासून सुरु होता. परिणामी जंगलातील प्राण्यांची संख्या दिवसे दिवस घटत चाललेली होती. त्यामुळे त्या जंगलातील सर्व पशू चिंतातुर बनले होते. प्राप्त परिस्थितीवर विचार कर-ण्यासाठी वनराज सिंहाने स पर्वशूंची सभा बोलावलेली होती. त्या सभेत पशूंना उद्देशून सिंहाने प्रास्ताविक भाषणात आवाहन केले–

' बंधुंनो, शस्त्रास्त्राच्या जोरावर आक्रमण करून सर्व पशु जगताचा विनाश करण्यासाठी मानव प्राणी टपून बसलेला आहे. त्याचा हा दुष्ट हेतू उधळून लावण्यासाठी संघटित व्हा ! एकजूट करा ! '

सिंहाचे अवाहन ऐकताच धीटपणे एक माकड म्हणाले,

' वनराज, पशु जगतातच फितुरी झाल्यावर एकजूट कशी होणार ? सर्वांचा नाश कसा टळणार ? '

माकडाच्या प्रश्नाने चक्रावून गेलेल्या सिंहाने विचारले,

' अरे मर्कटा, हे तू काय बरळतोस ? तुला म्हणायचं आहे तरी काय? सिंहाच्या प्रश्नावर माकड अधीरतेने म्हणाले,

' वनराज, या घनदाट जंगलात पशूंनी कुठेही लपण्याचा प्रयत्न केला तरी त्यांचा ठाव ठिकाण आधीच माहीत अस–ल्यासारखा तो मनुष्य प्राणी तिथं टपकतो आणि आपल्या बंदुकीच्या गोळयांनी अनेक पशूंना अगदी अचूकपणे टिपतो याचा अर्थ काय ? '

' आपल्यातील कुणीतरी त्या मष्नुयण्यप्राला फितुर झालेला असला पाहिजे ! '

एका म्हाताऱ्या अस्वलाने तर्क लढवताच सिंहाने गर्जना करीत विचारले,

' कोण आहे तो पशुद्रोही ? स्वतःच्या जातीशी द्रोह करणा–ऱ्याला योग्य ते शासन जरूर मिळेल. पशूंच्या हितासाठी त्या फितुराची कुणीही गय करु नका. बोला, कोण आहे तो नीच पशू ? '

सिंहाच्या प्रश्नावर क्षणाचाही विलंब न लावता कोल्हा ताडकून उत्तरला,

' वनराज, माझा तर्क असा अ हे की, मनुष्य प्राण्याला फितुर झालेला पशू माणसाळलेलाच असावा. त्या शिवाय असे स्वजातीयांचा घात करणारे नीच कृत्य त्याच्या हातून घडणारच नाही !'

' तुझा तर्क बरोबर आहे, पण असा माणसाळणारा कोणता पशू या जंगलात आहे ? '

सिंहाच्या प्रश्नावर कोल्हा पटकन उत्तरला,

' कुत्रा ! सर्व पशूत लवकर माणसाळणारा प्राणी म्हणजे कुत्रा !'

कोल्ह्याच्या उत्तरावर संतप्त झालेल्या सिंहाने कुत्र्याकडे तुच्छतेने पहात गर्जना केली,

' पशु–जगतातून हद्दपार करा त्या हलकट कुत्र्याला ! मनुष्य प्राण्याच्या हाताचे शिळे तुकडेच चघळू द्या त्या माणसाळलेल्या नीच पशूला ! '

सिंहाची गर्जना ऐकताच बिचारा कुत्रा जीव तोडून धावत सुटला. सर्व पशूंनी त्याचा पाठलाग करुन त्याला जंगलाबाहेर पिटाळून लावले.

कुत्र्याला जंगलातून हकलून दिले तरीही शिकारी पूर्ववत पशुहत्त्या करीतच राहिला. त्यामुळे पुन्हा पशूंची सभा भरली. त्यावेळी कोल्हयाने घोड्यावर पशु द्रोहाचा आळ घेतला. पशूंनी घोड्यालाही हद्दपार केले. तरीही शिकाऱ्याकडून पशुहत्त्या होण्यात किंचितही खंड पडला नाही. मग पुनःपुन्हा पशुंच्या सभा होत राहिल्या. त्या त्या वेळी कोल्हयाने मांजर, गाढव, गाय, बैल, म्हैस, बोकड अशा सारख्या पशूंवर फितुरीचा आरोप केला. त्या सर्व पशूंना जंगलातून हद्दपार व्हावे लागले. तरीही शिका–ऱ्याकडून पशूंची हत्त्या होण्यात तसूभरही फरक पडला नाही.

शेवटी निरपराध प्राण्यांवर फितुरीचा आळ घेऊन त्याना हद्दपार करण्यासाठी पशूंना प्रवृत्त करणाऱ्या कोल्हयाच्या वर्त–नाबाबत माकडाला संशय आला. झाडाच्या उंच शेंड्यावर चढून ते माकड कोल्हयाच्या हालचालीवर पाळत ठेवू लागले बार–काईने टेहळणी करू लागले.

अशाच तऱ्हेने झाडावरून टेहळणी करताना माकडाने एक दृश्य पाहिले आणि या झाडावरून त्या झाडावर उड्या घेतच ते

सिहाच्या गुहेजवळ आले, सिंह गुहेच्या दारात विचार करतच बसलेला होता. सिंहाला पाहताच माकड झाडावरून झरझर उतरले आणि घाई घाईने म्हणाले,

‘ वनराज, आजवर आपण निरपराध पशूंना फितुरीच्या आरोपावरून कोल्हयाच्या चिथावणीने हद्दपार केले, पण आज मी प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनी कोल्हयालाच फितुरी करताना पाहिलं ! ’

माकडाच्या निवेदनावर शंका घेत सिंहानं विचारलं.

‘ मर्कटा, तुला काही भ्रम तर झाला नाही ना ? अरे, तो कोल्हा फितुरी कशासाठी करील ? मनुष्य प्राण्याकडून त्याला असं काय मिळणार ? ’

सिंहाच्या शंकेचं निरसन करीत माकड उत्तरले,

‘ वनराज, क्षुद्र मनोवृत्तीचे प्राणी कोणत्याही क्षुद्र गोष्टीच्या प्राप्तीसाठी स्व जातियांशी द्रोह करु शकतात. त्यातून कोल्हा काकडीला किती राजी असतो ते आपणास माहीत असेलच. त्या काकडीच्या लोभासाठीच कोल्हा पशु द्रोहाचं पातक करीत आहे. थोड्याच वेळापूर्वी शिकाऱ्याकडून चार काकड्या घेऊन त्याच्या मोबदल्यात पशूंच्या वास्तव्याची स्थळं दाखवण्यासाठी शिकाऱ्या समवेत लपत छपत चाललेल्या कोल्हयास मी माझ्या डोळ्यांनी पाहिलेलं आहे. खात्रीच करून घ्यायची असेल तर आपण ससे बनात जाऊन शिकाऱ्याला मार्गदर्शन करीत अस–लेल्या कोल्हयास प्रत्यक्ष पाहू शकता. ’

माकडाच्या सांगण्यावरच विसंबून न राहता सिंहाने ससेबनात जाऊन जेव्हा पाहिले तेव्हा चार सशांची शिकार करुन शिकारी

ऐटीत परत निघालेला होता. त्याच्यामागून खुशीत काकड्या खात कोल्हाही त्याला निरोप देण्यासाठी चाललेला होता.

ते दृश्य पाहताच सिंहाचे पित्त खवळले. थोड्याच वेळात त्याने पशूंची सभा बोलावली. कोल्हाही त्या सभेस अगदी साळसूदपणे हजर होता. सिंहाने त्याची दखल न घेता सर्व पशूंना उद्देशून म्हटल

' बंधुंनो, आजवर आपण कोल्ह्यालाच चतुर समजत होतो, त्यामुळे त्याच्याच सूचनेवरून अनेक निरपराध पशूंना आपण हद्दपार केले. पण खरा फितुर अद्याप उजळ माथ्याने आपल्या– तूनच फिरतो आहे. आज माकड कोल्ह्याहूनही चतुर निघाले. त्याने आपल्यातील फितुराला अकचू ओळखले आहे. '

' कोण आहे तो नीच फितूर ? '

वाघोबांनी डरकाळी फोडून विचारताच कोल्ह्याकडे मिष्किल-पणे पहात माकड उत्तरले,

बंधुंनो तुमचा विश्वासही बसणार नाही, पण प्रत्यक्ष वनराजांच्या साक्षीनं, वनदेवतेच्या शपथेवर खरं तेच सागतो–

हा कोल्हाच आहे महापाजी ? हा होतो काकडीला राजी आणि करतो पशुंशी दगलबाजी ?'

'खरंच की काय ?'

लांडग्यानं शंका विचारताच त्या शंकेच निरसन करण्यासाठी माकडानं घडलेला सर्व प्रकार सांगितला. सर्वांची खात्री पटताच सिंहाने गर्जना करीत शिक्षा फर्मावली–

'या नीच पशूला देहांत प्रायाश्चित्त द्या !'

सिंहवाणी ऐकताच सर्व पशू कोल्ह्याच्या शरीरावर तुटून पडले. क्षणार्धात कोल्ह्याच्या शरीराचे लचके तोडू लागले.

# अहंकारी बेडूक

एका तळ्यात असंख्य बेडूक रहात होते. त्या बेडकांमध्ये सर्वांहून चार पावसाळे अधिक अनुभवलेला एक भला मोठा बेडूक होता. सर्व बेंडकात तो अधिक समंजस होता. तळ्यातील छोट्या-मोठ्या बेडकांना त्याचे मार्गदर्शन सतत लाभत असे. त्यामुळे सर्व बेंडूक त्याला तळ्याचा राजा मानत असत.'महाराज' असा आदबीने त्याचा उल्लेख करीत असत. तोही सर्वांना मान देत असे.

त्या तळ्यात राजा बेडकाच्याच वयाचा दुसरा एक बेडूक होता. त्यानेही राजा बेडकाप्रमाणेच इतरांहून चार पावसाळे अधिक पाहिलेले होते, पण अनुभवाने त्याला शहाणपण मुळीच आलेले नव्हते. लहानपणी एका खोडकर मुलाने त्याच्या मागील पायावर दगड मारल्यामुळे तो पाय कायमचा अधू बनलेला होता. त्यामुळे उड्या मारताना तो लंगडत असे. पाण्यात पोहतानाही त्याची गति इतराहून कितीतरी कमी असे. परिणामी इतर बेड–कांविषयी त्याच्या मनात नेहमी ईर्षेची भावना असे. नेहमीच तो इतरांशी फटकून वागत असे. इतरांनी मात्र आपल्याला मोठा मान द्यावा, असं त्याला वाटे. त्याच्या या कुढ्या स्वभावामुळे इतर बेडूकही त्याच्याशी फटकून वागत असत. राजा बेडकाला सर्वजण मान देत असल्यामुळे त्याच्यावर तो सतत जळत असे. राजा

बेडूक मात्र त्याची मन:स्थिती जाणून त्याला योग्य तो मान देत असे. गरज नसतानाही वेळोवेळी त्याचा सल्ला घेत असे. आदबीने 'स्वामी' असा त्याचा उल्लेख करीत असे.

एके वर्षी पाऊस चांगला झालेला होता तळं पाण्यानं तुडुंब भरलेलं होतं. त्यामुळे तळ्यातील सर्व बेडूक अत्यंत आनंदात होते. तरूण बेडकांच्या मनात तर उदंड उत्साह संचारलेला होता. त्या उत्साहाच्या भरात त्या वर्षी तळ्याकाठी मोठा वनमहोत्सव साजरा करण्याचा विचार त्यांच्या मनात आला. विचार येताच ते सल्ला घेण्यासाठी राजा बेडकाकडे गेले. सर्वांवरून नजर फिरवीत राजा बेडूक म्हणाला,

'मित्रहो, यंदा पाऊस चांगला झाल्यामुळे तुम्हा सर्वांचा आनंद अगदी अनावर होणं साहजिकच आहे. माझ्या मनातही तुमच्या–सारखाच आनंद ओसंडून वाहतो आहे. त्यामुळे या वर्षी मोठ्या उत्साहाने वनमहोत्सव साजरा करण्यासाठी तुमच्या इतकाच मीही उत्सुक आहे. पण अशा आनंदाच्या वेळी आपले स्वामी कुठंच कसे दिसत नाहीत ? आपण त्यांचाही विचार घ्यावा असं मला वाटतं.'

'कशासाठी घ्यायचा त्या लंगड स्वामीचा विचार ? आमच्या मनाचा विचार कधीतरी करतो का तो ? नेहमी एकलकोंड्यासा-रखा कुढत राहतो. आमच्यात तो कधीच मिसळत नाही. मग आम्हीतरी का घ्यावा त्याचा विचार ?'

एका तरूण बेडकाने अशी तक्रार करताच समजुतीच्या स्वरात राजा बडूक म्हणाला,

'अरे बाळ, कुणाचाही उपमर्द होईल असं कधी बोलू नये. काही

झालं तरी स्वामी तुम्हा सर्वांहून वयानं मोठे आहेत. त्यांचा मान राखायला हवा. विशेष प्रसंगी त्यांचाही सल्ला घ्यायला हवा.

राजा बेडकाच्या बोलण्यावर दुसरा एक तरुण बेडूक म्हणाला,

'महाराज, त्यांचा सल्ला घ्यायला काहीच हरकत नाही, पण हल्ली बराच काळ असतो कुठं तो या तळ्यात? एकलकोंड्या–सारखा तळ्याबाहेरच कित्येक दिवस भटकत असतो. मग त्याचा सल्ला आपण घेणार कधी आणि वनमहोत्सव होणार कधी?

त्या तरूण बेडकाच्या प्रश्नावर राजा बेडूक शांतपणे उत्तरला,

'बाळांनो, थोडा विलंब झाला तरी चालेल, पण वनमहोत्सवा-सारख्या आनंदाला कुणीही पारखं होऊ नये असं मला वाटतं.'

'पण महाराज, तो रडत राऊत लंगड स्वामी काहीतरी कुरापत काढून आमच्या साऱ्या आनंदाचा विचका करून टाकील, त्यापेक्षा त्याचा सल्ला न घेतलेलाच बरा.

तिसऱ्या एका तरूण बेडकानं सूचना मांडताच सर्व बेडकांनी ती उचलून धरली सर्वांनी एकमुखाने वनमहोत्सव त्वरीत साजरा करण्याचा ठराव पास केला. चारच दिवसात राजा बेडकाच्या अध्यक्षतेखाली तळ्याच्या काठावर वनमहोत्सव साजरा करण्याचा निर्णय पक्का झाला. समारंभाच्या तयारीसाठी अनेक समित्या नेमल्या. सर्व बेडूक उत्साहाने वनमहोत्सवाच्या तयारीला लागले.

वनमहोत्सवाचा दिवस उजाडला आणि नेमका त्या दिवशीच तो लंगडा बेडूक अचानकपणे तळ्यात टपकला. तळ्यातील सर्व बेडकात वनमहोत्सवाची उत्साहाने चर्चा चालल्याचे ऐकून त्याचे पित्त खवळले. तावा-तावाने तो त्यांना म्हणाला,

'मूर्खांनो, माझ्या अपरोक्ष वनमहोत्सव साजरा करण्याचा निर्णय

घेताना तुम्हाला लाज कशी वाटली नाही? मला डावलण्याचं धाडस तुम्ही केलंच कसं?'

लंगड्या बेडकाचा प्रश्न त्याच्यावरच उलटवीत एक तरूण बेडूक उत्तरला,

'अरे थेरड्या, आम्हाला असा प्रश्न विचारताना खरं तर तुलाच लाज वाटायला हवी. तुझा–आमचा काय संबंध? तू आमच्यात असतोसच कुठं? स्वतःच्या मनात कुढत कुठंतरी भरकटत जातोस. अहंकारान टम्म फुगून नेहमी आमच्याशी फटकून वागतोस. मग तुझा विचार करण्याचं आम्हाला तरी काय कारण?'

'कारण नाही ना? ठीक आहे, मग मीही पाहतोच तुम्ही वन-महोत्सव कसा साजरा करता ते!'

अशी धमकी देऊन अहंकाराने टम्म फुगलेला तो लंगडा बेडूक तळ्याबाहेर पडला आणि त्या तळ्यातील बेडकांचा वनमहोत्सव कसा उधळून लावता येईल त्याचा विचार करीत एक पाय हवेत उडवून उड्या मारीत जाऊ लागला.

इकडे त्या तरूण बेडकांनी राजा बेडकास घडलेला प्रसंग हुबेहूब वर्णन करून सांगितल्यावर राजा बेडूक खेदाने उद्गारला,

'अरे बाळांनो, या आनंदाच्या प्रसंगी घडलं ते फार वाईट घडलं तुम्ही आपल्या स्वामींचं मन दुखवायला नको होतं, अशा वेळी एखाद्याचं जरी मन दुखवलं तरी कोणता अनर्थ ओढवेल याची कल्पनाही करता येत नाही.'

राजा बेडकाच्या बोलण्यावर एक तरूण बेडूक म्हणाला,

'आमचं काय वाकडं करणार आहे तो लंगड स्वामी?'

तरूण बेडकाच्या प्रश्नावर शांतपणे राजा बेडूक म्हणाला,

'अरे बाळ, तुमचं जरी काहीच वाकडं होणार नसलं; तरी ज्याला राज्य चालवायचं असतं, त्याला तरी अशा अहंकारी प्राण्यापासून नेहमीच सावध राहावं लागतं. एक अहंकारी असंतुष्ट प्राणीही कधी कधी महाभयंकर अनर्थ ओढवू शकतो!'

'महाराज, आपण मुळीच चिंता करू नका. मी जातीनिशी त्या लंगडस्वामीच्या हालचालीवर चांगली पाळत ठेवीन आणि वनमहोत्सवाच्या आनंददायक प्रसंगी काही अनर्थ घडू देणार नाही.

एका तगड्या व तडफदार बेडकानं हमी देताच तळ्यातील सर्व बेडूक तळ्याच्या काठावर आले. सर्वजण उत्साहाने वनमहोत्सवाची तयारी करू लागले.

तो लंगडा बेडूक तळ्यातून निघाला तो सरळ एका सापाकडे आला. त्याला पाहताच साप जिभल्या चाटू लागला. तेव्हा तो लंगडा बेडूक त्याला म्हणाला,

'सर्पराज, माझ्याकडे पाहून जिभल्या चाटू नका. मित्रत्वाच्या नात्याने मी आपल्याकडे आलो आहे. यापुढे प्रत्येक दिवशी मी आपणास चांगल्या तगड्या बेडकांची मेजवानी देईन. आज आमच्या तळ्यातील बेडकांचा राजा तळ्याकाठी वनमहोत्सव साजरा करण्यात गुंतलेला आहे. तो बेसावध असल्यामुळे आपण त्याला सहज पकडून फस्त करू शकाल. तळ्यातील तो मोठ्यातमोठा बेडूक खाण्याची संधी घ्यायची असेल तर आपण माझ्या मागून यावं.'

त्या लंगड्या बेडकाचं बोलणं ऐकून सापाच्या तोंडाला पाणी सुटलं, त्यामुळे तो लंगड्या बेडकामागून सरपटत निघाला.

इकडे तळ्याकाठी बेडकांच्या वनमहोत्सवात रंग भरु लागलेला

होता. राजा बेडूक एका उंच खडकावर बसलेला होता त्याच्यासमोर तळ्यातील सर्व बेडूक ओळीने बसलेले होते. काही तरूण बेडूक एका सुरात स्वागत पद्य गात होते. एक तगडा बेडूक मात्र राजा बेडकामागे राहून सावधपणे सर्वत्र टेहळणी करीत होता. अशा तऱ्हेने बारकाईने टेहळणी करीत असता लंगड्या बेडकामागून दबा धरून सरपटत येणाऱ्या सापाकडे त्याचे लक्ष जाताच त्याने राजा बेडकाला सावध केले. राजा बेडकाने प्रसंगावधान राखून सर्व बेडकांना तळ्यात उड्या टाकून जीव वाचविण्याची आज्ञा दिली. क्षणार्धात सर्व बेडकांनी धोका ओळखून पटापट समोरच्या तळ्यात उड्या टाकल्या. राजा बेडूक त्याच्या मागे असलेल्या तगड्या बेडकासह तळ्याच्या काठावर आला. सापाचे संकट येताच तळ्यात उडी मारण्याच्या पवित्र्यात सापावर नजर ठेवून ते तळ्याच्या काठावर बसले

शिकार निसटल्याची सापाला जाणीव होताच तो चवताळला. लंगड्या बेडकामागून खूप दूर अंतरावरुन सरपटत आल्यामुळे त्याला सपाटून भूक लागलेली होती. भुकेल्या पोटी माघारी जाण्याची त्याची इच्छा नव्हती. त्यामुळे समोरच्या लंगड्या बेडकावरच हल्ला करून त्याने त्याला आपल्या जबड्यात पकडले हळुहळू तो त्याला गिळू लागताच सुटकेसाठी केविलवाणी धड-पड करीत तो सापाला विनवू लागला,

'सर्पराज, मी आपला मित्र आहे. मित्राशी अशी दगाबाजी करु नका.'

लंगड्या बेडकाचं बोलणं ऐकून तळ्याच्या काठावरील तगडा बेडूक त्वेषाने उद्गारला,

'अरे लंगडस्वामी, सर्पराजावर दगाबाजीचा आरोप करण्याचा तुला मुळीच अधिकार नाही. स्वतःच्या जातिबांधवांशी दगाबाजी करणारा तूच खरा दगाबाज आहेस. तुझ्या अहंकारी वृत्तीनेच तुला गिळले आता भोग आपल्या कर्माची फळे !'

त्याच क्षणी सापाने लंगड्या बेडकाला गटकन गिळून टाकले.

# जादूचे अस्वल

एक होता दरवेशी, त्याने एक अस्वल पाळले होते. त्याला त्याने निरनिराळे खेळ शिकविले होते. सुगीच्या दिवसात खेड्यापाड्यातील लोकांना अस्वलाचे खेळ दाखवून त्या मोबदल्यात लोकांकडून त्याला धान्य मिळत असे. सुगीचे दिवस संपले की तो शहरांकडे वळत असे. शहरी लोकांकडून त्याला थोडेफार पैसे व जुने कपडे मिळत असत.

अशा तऱ्हेने वर्षातील आठ महिने अस्वलाचा खेळ दाखवत तो गावोगावी भटकत असे. पावसाळा तोंडावर आला की तो आपल्या गावी येत असे. गावात त्याचं छोटसं घर होतं. त्या घरात त्याची बायको व चार मुलं राहत असत. आठ महिन्याच्या त्याच्या मिळकतीवर वर्षभर त्याची कशीतरी गुजराण होत असे. पावसाळा संपताच पोटासाठी अस्वलासह त्याला घराबाहेर पडावंच लागे.

असाच एकदा अस्वलाचा खेळ दाखविण्यासाठी तो दूरच्या

गावी चालला होता. चालून थकल्यावर वाटेत अस्वलाच्या वेसणीला असलेला दोर झाडाला बांधून विसाव्यासाठी तो त्या झाडाखाली बसला होता.

इतक्यात चित्र–विचित्र पोषाखातील एक विक्षिप्त माणूस त्या झाडाखाली आला. बसके नाक, मांजरासारखे मिच मिचे घारे डोळे, डोक्यावर वाढलेले केसांचे जंगल, बेंबीच्या देठापर्यंत वाढलेली दाढी. मर्यादेहून अधिक लांब असलेले कान, ड्र्यासारखे फुगलेले पोट, काळा कुळकुळीत रंग, उग्र चेहरा व त्याच्या बेढबपणाला साजेसा त्याचा चित्रविचित्र पोषाख असे त्या माणसाचे ओंगळ रुप पाहून दरवेशी खुदकन हसला. दरवेशी हसताच त्या माणसाचा मुळात उग्र चेहरा अधिकच उग्र भासू लागला. रागाने खवळून तो दरवेशाला म्हणाला,

"अरे मूर्ख दरवेशा, तू माझ्या रूपाला हसलास, पण माझ्या कर्तृत्वाची तुला जाणीव दिसत नाही. मला जादुगार कालिप्रताप म्हणतात. माझ्या जादूचा प्रताप पाहून लोकांचा भीतीने थरकाप उडतो."

जादुगार कालिप्रताप स्वतःच्या सामर्थ्याविषयी स्वतःची अवास्तव स्तुती करीत असावा, अशा समजुतीने त्याला खिजवण्याच्या उद्देशाने दरवेशी म्हणाला, "तुझ्या जादूचा एवढा प्रताप असेल तर वानगीदाखल मला एखादा प्रताप दाखव ना ?'

दरवेशाने आव्हान देताच आवेशाने पुढे सरसावत जादुगार म्हणाला,

"माझ्या जादूचा प्रताप पहायचा आहे काय तुला ? मग पहाच तर ... ... मी तुला अस्वलच बनवून टाकतो !"

जादुगाराने काहितरी मंत्र पुटपुटत दरवेशाभोवती तीन वेळा जादूची कांडी फिरवली आणि काय आश्चर्य !

दरवेशाचे रुपांतर अस्वलात झाले?

मग त्या जादुगाराने दरवेशाच्या खऱ्या अस्वलाची वेसण सोडून त्याला मुक्त केले. अस्वल मुक्त होताच रानोमाळ धावत सुटले. थोड्याच वेळात ते दिसेनासे झाले. जादुगाराने अस्वलाच्या रुपातील दरवेशाला वेसण घालून ओढत फरफटत आपल्या घरी नेले.

त्या दिवसापासून तो जादुगार आपल्या जादूच्या खेळाबरोबर दरवेशाच्या रुपातील अस्वलाचा खेळ दाखवू लागला. दरवेशाचे रूपांतर अस्वलात झाले असले तरी तो माणसासारखा हसू, रडू व बोलूही शकत होता. जादुगार त्याचा खेळ दाखवत असताना दरवेशी जादुगाराने आपणास जादूचे अस्वल कसे बनविले त्याची कर्मकहाणी प्रेक्षकांना रडून ओरडून सांगत असे. त्या दुष्ट जादु-गाराच्या तावडीतून आपली सुटका करण्याविषयी प्रेक्षकांना विन-वित असे. प्रेक्षकांना तो जादुच्या खेळातील एक भाग वाटत असे. जादुगार जादूच्या बळावर अस्वलास माणसासारखे बोलाव-यास लावतो हे पाहून प्रेक्षक बेहद्द खूष होत असत. लहान मुले तर आनंदाने टाळ्या पिटून मोठमोठ्याने हसत असत. आपण जीव तोडून आपली कर्मकहाणी सांगीतली तरी कुणाला ती खरी वाटत नसल्याचे पाहून दरवेशी खेदाने हसत असे. लोकांना त्याच्या हसण्याची अधिकच मौज वाटे. अशा तऱ्हेने दरवेशाच्या असाहाय्य परिस्थितीचा जादुगाराला फायदाच होत असे. त्याच्या जादूच्या सर्व खेळात 'जादूचे अस्वल' हा लहान थोर प्रेक्षकांच्या आकर्षणाचा

खेळ बनलेला होता. त्यामुळे जादूगाराच्या प्रत्येक खेळाला प्रक्ष–कांची तुफान गर्दी होऊन जादुगाराला खूप पैसे मिळत असत.

अस्वलाच्या वेशातील त्या दरवेशाला त्याच्या बायकोमुलांचा आठवण येताच तो अगदी अस्वस्थ होत असे. जादुगाराने पुन्हा आपले दरवेशाच्या मूळ रुपात रुपांतर करून आपली सुटका करावी म्हणून तो जादुगाराची खूप याचना करी. पण तसे केल्यास आपल्या जादूच्या खेळात 'जादूचे अस्वल' नसल्यामुळे प्रेक्षकांची संख्या रोडावून मिळकतीवर त्याचा अनिष्ट परिणाम होईल, या भीतीने जादूगार दरवेशाच्या याचनेला भीक घालीत नसे. बिचारा दरवेशी बायको–मुलांच्या आठवणीने कासावीस होत असे. जादुगाराच्या तावडीतून सुटण्यासाठी सतत धडपडत असे

एके दिवशी जादुगाराच्या मुलाचा लग्न समारंभ असल्यामुळे जादुगार दिवसभर धावपळीत होता. दिवसभराच्या त्या धावपळी-मुळे रात्री जादुगारासह त्याच्या घरातील सर्वजण गाढ झोपी गेले होते. ती संधी साधून दरवेशाने त्याला कोंडून ठेवलेल्या पिंजऱ्याचे दार मोडले व स्वतःची त्या पिंजऱ्यातून मुक्तता करून घेतली आणि कुणालाही चाहूल लागू न देता त्याने तेथून पोबारा केला.

अस्वलाच्या रूपातील दरवेशाला पळून जाण्यासाठी रात्रीची वेळच योग्य होती. मनुष्य वस्तीतून दिवसा आपल्या गावी जाणे त्याला अगदी अशक्य वाटत असल्यामुळे रात्रीच आपला गाव गाठण्याचा त्याने इरादा केला होता, त्याच्या डोळ्यासमोर त्याची प्रेमळ बायको व लाडकी मुलं सारखी तरळत होती. त्यांच्या ओढीनं तो रात्रभर सर्व शक्ती पायात एकवटून सारखा पळत होता. तरी देखील गावच्या वेशीत तो पोहचण्यापूर्वीच पहाट झाली

होती.

तो जेव्हा गावच्या वेशीत पोहचला, तेव्हा चांगलच उजाडलं होतं. गावच्या लोकांच्या हालचाली सुरु झालेल्या होत्या. एक गुराखी पोर गुरांमागून त्याच्याच दिशेनं येत होतं. आपल्याच नादात ते चाललं होतं. इतक्यात गुरांचं लक्ष अस्वलाच्या रुपा– तील दरवेशाकडं गेल्यामुळं गुरं बिथरली. कान टवकारुन जागच्या जागी ती उभी राहिली. अस्वलाकडे एकटक पाहू लागली गुरे का बिथरली म्हणून ते गुराखी पोर पुढे सरसावून पाहू लागलं समोर अस्वल दिसताच त्यानं घाबरुन बोंब ठोकली. त्याची भीती दूर करण्याच्या उद्देशाने दरवेशी म्हणाला.

"अरे बाळ, घाबरू नको. मी तुला कोणताही उपद्रव करणार नाही, अरे, मी याच गावचा दरवेशी आहे. निष्कारण का घाबर– तोस?" दरवेशी त्या पोराला धीर देण्याचा प्रयत्न करीत होता. पण त्याचे बोलणे ऐकताच त्या पोराची भीतीने अधिकच बोबडी वळली आणि 'भू भू . भूत! असे बेंबीच्या देठापासून किंचाळत ते पोर बेशुद्ध पडले. त्या प्रकारापासून दरवेशाला हे समजून चुकले की, अस्वलाच्या रुपात तो असल्यामुळे त्याने माणसासा. रखे बोलता कामा नये. तसे घडल्यास त्याची बायको मुलंही त्याला भूत समजून घाबरतील आणि घराबाहेर हाकलून देतील असे तसे घडले तर त्यांचा सहवासही त्याला लाभणार नाही- अस्वलाच्या खेळावर पोट भरण्याचा धंदा वंश परंपरेने त्याच्या घरी चालत आल्यामुळे अस्वल म्हणून आपण घरी गेलो तर भीतीऐवजी सर्वांना आनंदच वाटेल, असा विचार करून तो धाव– तच आपल्या घराकडे निघाला. वाटेत त्याच्या परिचयाचे अनेक

गावकरी त्याला भेटले. पण त्याला पाहाताच सर्वांची भीतीने गाळणच उडाली. प्रत्येकजण त्याला घाबरून वाट मिळेल त्या दिशेने धावत होते. धावता धावता ठेचकाळून पडत होते. उठून पुन्हा धडपडत, आरडाओरडा करीत सैरावैरा धावत होते. दरवेशी मात्र आपल्या घरच्या ओढीनं धावत होता.

जेव्हा तो आपल्या घरी पोहचला. तेव्हा त्याचा मोठा मुलगा बाहेरच्या खोलीत बसलेला होता. अस्वलाच्या रूपातील दरवेशाला पाहताच त्याला वाटले की त्याचा बाप अस्वलासह परत आलेला असावा. त्यामुळे त्याने अतिशय आनंदाने आपल्या आईला हाक मारली. स्वयंपाक घरातून त्याची आई धावतच बाहेरच्या खोलीत आली. अस्वलास पाहून तिने अतिशय आतुरतेने मुलास विचारले,

"आपले अस्वल तर सुखरूप परतले, पण तुझे बाबा कुठे आहेत?" मुलगा म्हणाला, "अस्वलासमवेत बाबा नव्हते. अस्वल एकटेच आले."

मुलाचे स्पष्टीकरण ऐकताच आपल्या नवऱ्याचे वाटेतच काही बरे वाईट झाले असावे, त्यामुळे एकटे अस्वल घरी परतले असावे, या शंकेने तिने धाय मोकलून रडावयास सुरूवात केली, तिचे रडणे ऐकून मुलांनीही रडारड सुरू केली सर्वांचा आक्रोश ऐकून शेजा-पाजारीही गोळा झाले एकटे अस्वल घरी परतले. त्या अर्थी दरवेशी प्रवासातच कुठे तरी मेला असावा असाच सर्वांनी निष्कर्ष काढल्यामुळे दरवेशाची बायको मुलं अधिकच अक्रोश करु लागला. त्यांचा आक्रोश ऐकून खरा प्रकार सर्वांना समजावून सांगण्याचा दरवेशाला क्षणभर मोह झाला. पण घड-लेल्या प्रकारावर कोणाचाही विश्वास बसणार नाही, उलट

आपणास मृत दरवेशाचे भूत समजून गावकरी गावाबाहेर हकलून देतील किंवा मारूनही टाकतील या भीतीपोटी दरवेशी मुकपणे केवळ अश्रु गाळू लागला. त्याच्या डोळ्यातील अश्रू पाहून दरवेशी नक्कीच मेला असावा, अशी सर्वांची पक्की खात्रीच झाली.

मग शेजाऱ्या पाजाऱ्यांनी दरवेशाच्या बायको–मुलांचे सांत्वन करून असे सुचविले की, दरवेशाच्या मोठ्या मुलाने अस्वलाचा खेळ दाखविण्याचा वंशपरंपरेने चालत आलेला व्यवसाय करून कुटुंबाचे पालन–पोषण करावे लोकाना सल्ला दरवेशाच्या मुलासही पटला बापा माघारी कुटुंबाच्या चरितार्थाची जबाबदारी स्वीकारण्याचा त्याने निश्चय केला. अनायसे अस्वल स्वतःहून त्याच्या घरी आल्यामुळे अस्वल मिळण्याची त्याला विवंचना नव्हती. त्यामुळे दुसऱ्याच दिवसापासून अस्वलाचा खेळ दाखवण्यासाठी बाहेर गावी जाण्याची त्याने तयारी केली. दरवेशीही मनात संतुष्ट झाला. अस्वलाच्या रुपात का होईना, आपल्या बायको मुलांच्या उदरनिर्वाहासाठी आपला उपयोग होईल व त्यांच्या सुख दुःखात सहभागी होता येईल या कल्पनेने तो मनातून सुखावला.

दुसऱ्या दिवसापासून दरवेशाचा मुलगा आसपासच्या गावात अस्वलाचा खेळ दाखवू लागला अस्वलाच्या रूपातील तो दरवेशी खेळात खूपच रंगत आणू लागला. माणसासारख्या कोलाटच्या उड्या मारणे, शीर्षासन करणे, हातावर चालणे, ऐटीत विड्या सिगारेटी ओढणे इत्यादी त्याचे खेळ लोकांना खूप आवडू लागले एकदा तर एका सायकल स्वाराने खेळ पाहण्याच्या

उद्देशाने बाजूस बाजूस उभी केलेली सायकल चालवून त्याने प्रेक्षकांना अश्चर्याने थक्कच केले. दरवेशाच्या मुलास लोक सांगू लागले की, त्याने अस्वलाचा खेळ शहरात दाखवला तर त्याचे खरे चीच होईल. शहरी प्रेक्षक त्याच्यावर पैशाचा पाऊस पाडतील लोकांके म्हणणे दरवेशाच्या मुलासही पटले अस्वलाचा खेळ दाखवत दाखवतच तो एका शहरात आला. तिथे त्याला खूप पैसे मिळू लागले.

एके दिवशी एका सर्कशीच्या मालकाचे लक्ष त्या खेळाने वेधून घेतले. अस्वलाचे ते खेळ पाहून त्याला वाटले की, असले अस्वल आपल्या सर्कशीत आले तर प्रेक्षकांचे ते खास आकर्षण ठरु शकेल असा विचार करून अस्वल विकत घेण्याच्या इराद्याने तो खेळ संपेपर्यंत तेथेच थांबला.

जेव्हा खेळ संपला व प्रेक्षक आपापल्या घरी निघून गेले, तेव्हा सर्कशीचा मालक देरवेशाच्या मुलाजवळ गेला आणि म्हणाला,

'बाळ, तुझे अस्वल मला विकत देतोस का ?'

त्याच्या प्रश्नावर दरवेशाचा मुलगा उत्तरला.

'साहेब, या अस्वलाच्या खेळावरच मी बापा माघारी चार माणसांची पोट भरतो, अशा परिस्थितीत हातचं अल्वल विकून काय करू ?'

'तू दुसरं अस्वल विकत घे ना ?'

'अहो, पण तुम्हीच दुसरं का घेत नाही.'

'तुझ हे अस्वल 'जादूच्या अस्वला' सारखं कोणल्याही अस्वलास अशक्य असणारे खळ करतं, माझ्या सर्कशीतच याच्या

खेळाचं खरं चीज होईल, म्हणून मला हेच अस्वल हवं याच्या मोबदल्यात मी रोख पन्नास हजार रुपये देऊ शकेन आयुष्यभर रस्त्यावर अस्वलाचा खेळ दाखवून तुला एवढी मोठी रक्कम मिळू शकणार नाही. तुझ्या कुटुंबाला सुखात जगता येईल, इतकी रक्कम तुला मिळाल्यावर हे अस्वल विकायला काय हरकत आहे ?'

अस्वलाच्या रुपातील दरइशी गंभीरपणे दोघातील संभाषण ऐकत होता. मुलाने आपणास विकल्यास आपल्या बायको मुलांशी आपली पुन्हा ताटातूट होईल, या कल्पनेने तो अगदी व्याकुळ झाला होता. त्याच्यां डोळ्यात गहिवर दाटला होता. मुलगा काय उत्तर देतो ते ऐकण्यासाठी त्याचे कान अधीर झाले होते. सर्क्रशीचा मालक मुलास पुन्हा पुन्हा विचारीत होता.

'गोल, काय ठरला तुझा निर्णय ?'

मुलगा विचार करुन उत्तरला.

'मी अस्वल विकायला तयार आहे !'

मुलाचे उत्तर ऐकताच सर्कशीच्या मालकाने आपल्या हातातील बॅग ऐटीत खोलली आणि तीमधून पन्नास हजारांच्या नोटांची पुडकी दरवेशाच्या मुलाच्या झोळीत टाकली. अत्यंत दक्षतने झोळी सांभाळीत मुलाने अस्वलाच्या गळ्यातील कंठ्यात बांधलेली साखळी सर्कशीच्या मालकाच्या हाती दिली मालक साखळी ओढत चालू लागला. एकीकडे त्याला कुटुंबाशी कायमची ताटातूट झाल्याचं पुःख होतं, तर दुसरीकडे त्याच्या कुटुंबाचं कायमचं कल्याण झाल्याचं समाधानही होतं !

म. सं. मं. कुर्ले, ...
क्र. २८९६ दि. २५/५/८०
विषय ४|५१

# साप, मुंगूस आणि जादुगार

एकदा एका नाग सापाची आणि मुंगसाची समोरासमोर गाठ पडली. एकमेकांना जन्मजात वैरी समजणारे ते दोघेही परस्परांशी झुंज देण्याच्या पवित्र्यात सज्ज झाले. नाग आपला फणा उंच उभारून फुत्कारू लागला. मुंगूस नागावर आक्रमण करण्याच्या इरादयाने दबा धरून चित्कारु लागले. परस्परांची नजरानजर होताच दोघेही वैर भावनेने पेटून उठले. एकमेकावर तुटून पडले. नाग मुंगसास त्वेषाने दंश करण्याचा प्रयत्न करू लागला. मुंगूस नागास चकवून त्याच्या शरीराचे तुकडे पाडण्यासाठी नागावर झडप घालू लागले. परस्परांवर हल्ले–प्रतिहल्ले होऊ लागले. नागाने मुंगसाच्या शरिरास जबरदस्त विळखा घालण्याचा प्रयत्न करावा आणि मुंगसाने चपळाईने सुटका करून घ्यावी, असा प्रकार बराच वेळ चालू होता. परस्परांशी लढून दोघेही जखमी झाले होते. दोघांच्याही अंगात त्राण उरले नव्हते. तरीही पर–स्परांशी ते निकराची झुंज देतच होते.

त्यांची ती चित्त थरारक झुंज पाहण्यासाठी लोकाची तोबा गर्दी उसळलेली होती. खरं तर ती झुंज जीवघेणी होती, पण लोकांना ती पाहण्यात मौजच वाटत होती. अगदी तल्लीनतेने लोक ती झुज पहात असतानाच एक जादुगार तेथे टपकला. तो

गावोगावी फिरून लोकांना जादूचे खेळ दाखवत असे. लोकांनी खुषीने दिलेल्या चार पैशावर तो आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवत असे. तेच तेच जादूचे खेळ पाहून कंटाळलेले लोक अलिकडे त्याला फारसे पैसे देत नसत. त्यामुळे यापुढे आपल्या कुटुंबाचा उदर निर्वाह कसा करावयाचा. या विवंचनेतच तो होता.

साप आणि मुंगसाची झुंज पाहण्यात लोकांना मौज वाटते हे पाहता क्षणीच त्या जादुगाराच्या डोक्यात एक कल्पना चमकून गेली. त्या सरसा लोकांच्या गर्दीतून वाट काढत तो पुढे झेपा-वला परस्पराशी झुंज देण्यात तल्लीन झालेल्या सापास आणि मुंगसासही त्याने चपळाईने पकडले. लोकांच्या मदतीने दोघां-च्याही जखमा धुवून–पूसून औषधपाणी केले त्यांना अंडी खाऊ घातली. दूध पाजले. मग त्यांच्या अंगात थोडी हुशारी आली.

अशा तऱ्हेने आठ दिवस त्यांना खाऊ पिऊ घालून जखमावर औषधपाणी केल्यावर साप–मुंगसाच्या तब्येतीत चांगलीच सुधा-रणा झाली. ते पाहून लोकांना वाटले, किती दयाळू हा प्राणि-मित्र ! किती महान आहे याच प्राणिप्रेम ! साप आणि मुंगुसही त्या प्रेमाने भारावून गेले. जादुगाराचे उपकार आठवून त्यांची अंत:करणे हेलावून गेली. पण ..

थोड्याच दिवसात ‘ घी देखावा, लेकिन बडगा नहीं देखा ’ या म्हणीचा त्यांना अनुभव आला. जादुगाराने त्यांचे दात मुळासह उपटून टाकले. मुंगसाच्या गळ्यात पट्टा बांधून त्याला साखळीने जखडून ठेवले. सापाला बांबूच्या करंडीत बंदिस्त केले. त्यांच्या वरचे औषधोपचार आणि मऊ मऊ अन्न पदार्थ खायला

देण्यात मात्र मुळीच हयगय केली नाही. असं करण्यात जादु-गाराच्या मनात नक्की कोणता हेतू आहे, ते त्या दोघांनाही कळेना. त्यांनी चावा घेऊन परस्परांना दुखापत करू नये या शुद्ध हेतूने त्या जादुगाराने स्वतःच्या इच्छे विरुद्ध त्यांचे दात उपटण्याचे क्रूर कृत्य केले, की त्याच्या मनात आणखी काही हेतू आहे, या बाबत त्यांचे मन संभ्रमात पडले. जादुगार त्यांचा उपकार कर्ता मित्र आहे, की त्यांच्या असहाय्य परिस्थितीचा फायदा घेऊन त्यांना छळणारा शत्रू आहे, तेच समजेना.

त्याचा तो संभ्रम दूर होऊन सत्य उजेडात येण्यास फार वेळ लागला नाही. त्यांच्या तोंडातील जखमा बऱ्या होताच तो जादुगार त्यांना गावोगावी फिरवू लागला. लोकांना त्यांच्या झुंजीचा खेळ दाखवू लागला त्यात त्याला खूप पैसे मिळू लागले. मग पैसे मिळवण्याची हाव इतकी वाढली की त्यासाठी सकाळ-पासून सायंकाळपर्यंत तो त्या सापा-मुंगसाला पुनःपुन्हा झुंजवत ठेवू लागला.

दिवसामागून दिवस निघून जात होते. स्वार्थापोटी जादुगार आयुष्यभर आपणास झुंजवत ठेवणार हे कटु सत्य त्यांना कळून चुकले होते. रोज रोजच्या त्या झुंजीने ते पुरते वैतागून गेले होते. परस्परातील त्या झुंजण्याविषयी त्यांच्या मनात घृणा निर्माण होऊ लागली होती त्यांच्यातील वैरत्वाची भावना नष्ट होऊन एकमेकाविषयी सहानुभूतीची भावना मूळ धरू लागली होती. आता त्यांना परस्परांशी झुंजण्याची मुळीच ईर्षा उरली नसली तरी जादुगाराला त्यांनी सतत झुंजत राहण्याची आव-श्यकता होती. त्यातच त्याचं हित होतं, त्यामुळे त्याना सतत

झुंजत ठेवण्यासाठी तो काठीचा धाक दाखवून छेडत होता. त्याच्या इच्छेसाठीच स्वतःच्या इच्छेविरूद्ध ते लुटूपुटूची झुंज खेळत होते.

परस्परातील वैरभावनेमुळे दोघेंही स्वतःचे स्वातंत्र्य गमावून बसल्याचा साप आणि मुंगसालाही आता फार पश्चा–त्ताप होत होता. गुलामगिरीचं लाजिरवाणं जिणं जगण्यापेक्षा परस्परांशी निकराची झुंज देऊन दोघांनीही एकमेकाचे प्राण घ्यावेत असे विचार निराशेपोटी कधी कधी त्यांच्या मनात येत. पण त्यांचे तीक्ष्ण दात उपटून जादुगाराने मरण्याचे स्वातंत्र्यही त्यांच्या स्वाधीन ठेवले नव्हते त्यांना या गोष्टीची खूपच खंत वाटत होती.

त्यामुळे रात्रंदिवस ते जादुगाराच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याबाबत विचार करीत असत तशी संधी मिळताच सुटकेसाठी धडपडत असत. पण जादुगाराच्या जागरूकपणामुळे त्यांच्या धडपडीला यश येत नसे, मग पुन्हा ते नव्या संधीची वाट पहात असत.

एके दिवशी त्यांच्या सुदैवाने सुटकेसाठी त्याना एक नामी संधी चालून आली. त्या दिवशी एका गावच्या यात्रेत त्यांच्या झुंजीचा खेळ दाखवून जादुगाराने नेहमीपेक्षा कितीतरी पटीने अधिक पैसे मिळवले होते. गरजेहून अधिक मिळालेले पैसे पाह–ताच जादुगाराच्या डोक्यात थोडी चैन करण्याचे विचार थैमान घालू लागले. त्यासाठी तो एका दारूच्या गुत्त्यावर गेला. तेथे त्याने खूप दारू ढोसली. त्या दारुच्या नशेतच तो गावा बाहे–रील मारूतीच्या देवळात आला. देवळातील एका खांबाला मूंग–

साच्या गळ्यातील साखळी बांधली सापाच्या करंडी वरील झाकणावर एक दगड ठेवला आणि बसल्या जागीच कलंडला. दारूच्या नशेमुळे थोड्या वेळातच त्याची शुद्ध हरवली.

ती संधी साधून मुंगूस समोरच्या करंडीतील सापाला उद्देशून म्हणाले,

' नागराज, आज या स्वार्थी जादुगाराच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याची नामी संधी आपल्यापुढे चालून आलेली आहे. परस्परातील वैर विसरुन आपण एकमेकास सहकार्य केले तरच या गुलामगिरीतून आपली सुटका होऊ शकेल ' मुंगूस भाऊ, या दुष्ट जादुगाराच्या गुलामगिरीतूत मुक्त होण्यासाठी कोणतंही दिव्य करायची माझी तयारी आहे. पण करंडीत मी बंदिवाना–सारखा कोंडला गेलो आहे. अशा परिस्थितीत मी काय करू ? '

सापाच्या प्रश्नावर मुंगूस म्हणाले,

'समज मी तुला या करंडीतून मुक्त केले तर तू माझ्या मुक्ततेसाठी काय करु शकशील ?'

'मीही तुझ्या गळ्यातील साखळीतून तुझा गळा मुक्त कर–ण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीन. तुझी मुक्तता झाल्याखेरीज तसूभरही येथून हलणार नाही.'

सापाने वचन देताच मुंगसाने सर्व शक्तीनिशी त्या सापाच्या करंडीवरील दगड दूर ढकलला, मग पायाच्या नख्यांनी वरचे झाकण दूर करताच उत्साहाने सळसळतच साप करंडीतून बाहेर आला.

जादुगाराच्या गुलामगिरीतून सुटका झाल्याचा सापाला अति-शय आनंद झालेला होता. पण मुंगसाच्या गळ्यातील साखळीकडे

लक्ष जाताच मुंगसाची मुक्तता कशी करायची या बाबत तो गंभीर पणे विचार करू लागला. काम कितीही कठीण असले तरी ते करण्यामागे प्रामाणिकपणे प्रयत्न करण्याची इच्छा असल्यास योग्य मार्ग सुचतोच. त्या सापालाही तो मार्ग सुचला. मारूती–च्या देवळात भक्तांनी मारूतीरायाला वाहिलेले तेल–तांदूळ खाण्या साठी उंदरांचा अगदी सुळसुळाट झालेला होता. त्यातील एखाद्या उंदरास पकडून मुगसाच्या गळ्यातील चामडी पट्टा त्या उंदराक-डून कुरतडल्यास मुगूसभाऊची सुटका करणे शक्य होईल, अशा विचाराने साप दबा धरून बसला थोड्याच वेळात एका उंदरास पकडण्यात तो यशस्वीही झाला.

सापाने त्या उंदरास मुगसाच्या गळ्यातील चामडी पट्टा कुर-तडण्यास फर्मावले. सापाच्या भीतीमुळे उंदराने आपल्या तीक्ष्ण दातांनी मुगसाच्या गळ्यातील पट्टा भराभर कुरतडताच मुगूस गळ्यातील साखळीच्या बंधनातून मुक्त झाले. परस्परांच्या सह–कार्यामुळे जादुगाराच्या गुलामगिरीतून कायमची मुक्तता झाल्या-या आनंदात साप–मुगूस एकमेकास प्रेमभराने क्षणभर कडकडून भेटले. दुसऱ्याच क्षणी भय आणि आश्चर्याने थक्क झालेल्या उंदराचा त्यांनी कृतज्ञतेने निरोप घेतला आणि मुक्त जीवन जगण्यासाठी ते आनंदाने सुसाट धावत सुटले.

# सुसरीणबाई तुझी पाठ मऊ

'माकडांचा मळा' नावाचा एक मळा होता. त्या मळ्यांत खूप माकडे होती. त्या माकडामध्ये एक म्हातारे माकड होते. इतर माकडांहून त्याचा अनुभव मोठा असल्यामुळे इतर माकडांना नेहमी ते हिताच्या चार गोष्टी सांगत असे. कोणत्या प्रसंगी कसे वागावे त्यासंबंधी उपदेश करीत असे. बरीच आज्ञाधारक माकडे त्याच्या सल्ल्यानुसार वागत असत, एक माकड मात्र त्या म्हाताऱ्या माकडाच्या उपदेशाची नेहमी टर उडवत असे. त्या उद्धट माकडाला कधीतरी त्याच्या उद्धट वर्तनाबद्दल जबरदस्त सजा भोगावी लागणार याची खात्री असल्यामुळे म्हातारे माकड गालातल्या गालात हसून त्याच्याकडे दुर्लक्ष करीत असे. त्यामुळे त्या उद्धट माकडाला म्हताऱ्या माकडाची टर उडविण्यास अधिकच चेव येत असे, म्हातारे माकडही उपदेशकाची भूमिका तितक्याच नेटाने पार पाडण्यात कधीही कुचराई करीत नसे.

एकदा कडक उन्हाळ्याच्या दिवसात सर्व माकडे एका मोठ्या झाडाच्या गर्द सावलीत बसली होती. बोलता बोलता काहीतरी विषयावरून म्हातरे माकड सर्वांना उद्देशून म्हणाले,

'अरे बाबांनो, दुसऱ्याशी बोलताना नेहमी गोड बोलावे. स्तुती

सर्व प्राणीमात्रांना आवडते. दुसऱ्याची स्तुती केल्यामुळे स्वतःस काही कमीपणा येत नाही. उलट स्वतःच्या मोठेपणात वाढच होते. स्तुतीने शत्रूलाही वश करता येते,'

म्हाताऱ्या माकडाचा उपदेश इतर माकडे गंभीरपणे ऐकत होती. एका कोपऱ्यात बसलेले ते उद्धट माकड मात्र मिष्किलपणे हसत होते. म्हाताऱ्या माकडाला त्याचे ते हसणे आव्हान वाटल्यामुळे उद्धट माकडाला त्याने विचारले,

'का रे बाबा, माझ्या बोलण्यावर विश्वास बसत नाही?'

'मुळीच नाही.'

'माझं कोणतं विधान तुला खटकलं?'

"स्तुतीने शत्रूलाही वश करता येते' हे तुझं विधान मला खटकलं म्हाताऱ्या.'

'का खटकलं?'

'ते खरं नाही म्हणून.'

'खोटं का वाटतं तुला?'

'तू ते सिद्ध करून दाखवशील?'

'वेळ येईल तेव्हा अवश्य सिद्ध करुन दाखवीन.'

म्हाताऱ्या माकडाने संमती दर्शविताच उद्धट माकड म्हणाले,

'हे बघ म्हाताऱ्या, जांभूळवनातील तळ्यात असलेली सुसर आपला शत्रू आहे. तिने आपल्यातील अनेक माकडे तळ्याकाठी पाणी पिण्यास गेली असताना खाऊन फस्त केलेली आहेत. तिला स्तुतीने तू वश कर. तिच्या पाठीवरून तळ्याच्या पैलतीरला जा. हे धाडस तू करुन दाखवलेस तर तुझं मत मी खरं मानायला तयार आहे. माझं हे आव्हान स्वीकारण्याची तुझी तयारी आहे

का ?'

उद्धट माकडाने आव्हान करताच म्हाताऱ्या माकडाने होकार्थी केवळ मान डोलावली आणि ते तडक जांभूळबनाच्या दिशेने निघाले. त्याच्यामागून खोडया करीत ते उद्धट माकड व त्याच्या मागून गंभीरपणे इतर माकडेही चालू लागली.

थोडयाच वेळात सर्व माकडे जांभूळबनातील तळयाकाठी आली तळयाच्या काठाला सुसर दबा धरून बसलेलीच होती. तिला उद्देशून म्हातारे माकड म्हणाले,

'काय हो सुसरीणबाई, तळयाकाठी उन्हं खायचं चाललयं की काय ?'

'होय हो म्हातारबाबा, दुसरं काय करणार इथं बसून ? तळयाच्या गार पाण्यात राहून कंटाळा आला म्हणून आपलं उन्हं खाण्यासाठी तळयाबाहेर यावं म्हटलं घटकाभर.'

'बर केलतं. पण बाईसाहेब, हल्ली आपलं कसं काय चाललंय ?'

'चाललयं ते उत्तमच म्हणायचं म्हातारबाबा.'

'तब्येत वगैरे ठीक आहे ना ?'

'हो ठीकच आहे.'

'पोरं बाळं सुखी आहेत ना?'

'आहेत की—अगदी मजेत आहेत ती.'

'असणारच. तुमच्यासारख्याची गुणी पोरं नेहमी सुखीच असाणार. 'शुद्ध बीजा पोटी फळे रसाळ गोमटी' म्हणतात ते काही खोटं नाही. अहो, तुमचा थोरला पोर तर फारच गोड्स. त्याची पाठ तर अशी मऊ म्हणता की एखाद्याला वाटावं लोण्याचा गोळाच.'

2898

'अहो, पण तुम्हाला कसं कळलं ?'

'हे काय विचारणं बाईसाहेब?' अहो, कितीतरी वेळा त्या परोपकारी पोरानं मला आपल्या मऊ पाठीवर बसवून तळ्याच्या पैल तीराला नेऊन सोडलंय ना !

आता ही मी त्याचीच वाट पाहतोय.'

'कशासाठी ?'

त्याच्या मऊशार पाठीवरून मला तळ्याच्या पैलतीराला जायचं आहे ना ?'

'मग त्याची वाट कशाला पाहता ? चला ना माझ्याच पाठीवरून? मी ही तुम्हाला माझ्या पाठीवरून अगदी अलगद पैलतीराला पोचविन.'

'सुसरीणबाई, तुमची पाठ तर लोण्याहूनही मऊ असणार. मला तुमच्या पाठीवरून पैलतीर गाठण्यात सुख-समाधानच वाटेल, पण तुम्हाला त्रास नाही ना व्हायचा ?

'छे, छे. त्रास कसला त्यात म्हातारबाबा ? तुमच्यासारख्या प्रेमळ म्हाताऱ्याची सेवा करण्यात मला धन्यताच वाटेल. तुम्ही निःसंकोचपणे माझ्या पाठीवर बसा .'

सुसर स्तुतीला भाळल्याची पक्की खात्री होताच म्हाताऱ्या माकडाने सावधपणे तिच्या पाठीवर अगदी अलगद उडी मारली. मग सुसरीने त्याला सुरक्षितपणे पैलतीराला नेऊन सोडले. म्हातारे मार्कड सुसरीच्या तावडीतून सुरक्षितपणे पैलतीराला पोचल्याचे पाहताच ऐल तीरावरुन इतर माकडांनी आनंदाने बेहोष होत टाळ्या पिटल्या. त्यांचा तो जल्लोष उद्धट माकडाला मुळीच सहन होईना. म्हाताऱ्या माकडाचा विजय आणि स्वतःचा पराजय

त्याला स्वस्थ वसू देईना. तो द्वेषाने जळत असतानाच इतर माकडांनी त्याला म्हाताऱ्या माकडासारखेच सुसरीच्या पाठीवरून पैलतीराला जाण्याचे आव्हान दिले. द्वेषापोटी त्यानेही ते स्वीकारले. मग त्यालाही पैलतीराला नेण्याविषयी सर्वांनी सुसरीला विनंती केली. सुसरीने ती मान्य करताच त्या उद्धट माकडाने धप्पकन सुसरीच्या पाठीवर उडी मारली. जोराने उडी मारल्यामुळे सुसरीच्या पाठीवरील करवती कडा त्यांच्या पायात घुसल्या. त्या वेदनेने मेंदूला झिणझिण्या येताच परिस्थितीचे भान सुटल्यामुळे ते माकड उद्धटपणे सुसरीला म्हणाले,

'मूर्ख सुसरिणी, त्या म्हातारड्या माकडाने तुझी खोटी स्तुती केली. तो तुझी पाठ लोण्यासारखी मऊ म्हणतो, पण मला तर तुझी पाठ वज्रासारखी कठीण आणि खडबडीत वाटते. तुझ्या पाठीवर बसण्यापेक्षा तीक्ष्ण सुळयावर बसणे अधिक बरे असे मला जाणवते.'

उद्धट माकडाने सुसरीच्या पाठीची केलेली निंदा ऐकताच सुसर संतापाने खवळून उठली. क्षणार्धात तिने तिच्या पाठीवर बसलेल्या त्या उद्धट माकडास शेपटीचा जोरदार फटकारा मारून खाली पाडले. त्या फटकाऱ्यानेच अर्धमेल्या झालेल्या त्या माकडास आपल्या प्रचंड जबड्यात पकडून ती सुसर तळ्याच्या खोल पाण्यात दिसेनाशी झाली.

त्या उद्धट माकडाच्या आत्म्यास शांती मिळावी म्हणून पैलतीरावरून म्हाताऱ्या माकडाने शांतपणे श्रद्धांजली वाहिली.

# कथा मानव प्राण्याची

फार फार वर्षापूर्वीची गोष्ट.

· पृथ्वीची निर्मिती केल्यावर ब्रम्हदेव आपल्याच निर्मितीचे निरीक्षण करण्यात मग्न झाला होता. पृथ्वीवरील महासागर, नद्या—नाले, डोंगर, दऱ्या आणि घनदाट अरण्ये पाहून तो समा—धान पावला होता, पक्ष्यांची मंजुळ गीते ऐकून त्याचे कान तृप्त झाले होते. तृप्तीच्या त्या आनंदातच त्याचे डोळे मिटले होते.

त्याच वेळी त्याच्या कानावर असंख्य ध्वनींचा गलका आदळला— ' देवा डोळे उघड ! '

ब्रम्हदेवाने खडबडून डोळे उघडीत समोर पाहिले.

पृथ्वीवरील सर्व पशू ब्रम्हदेवासमोर धरणे धरुन बसले होते, सर्वात पुढे सिंह बसला होता. तोच त्यांचा नेता असावा असा अंदाज बांधून ब्रम्हदेवाने त्याला विचारले,

' वनराज का आला आहात हा विराट मोर्चा घेऊन ? '

ब्रम्हदेवाने प्रश्न विचारताच सिंह गुरगुरला,

' देवा, डोळे उघडून आम्हा पशूंकडे एकदा नीट पहा. '

' अरे, मी नेहमीच तुमच्याकडे पाहतो. आजच असा विशेष फरक तो काय पडणार आहे माझ्या दृष्टीत ? '

' आमच्यातील एक मोठ्यात मोठी उणीव तुझ्या दृष्टीस का दिसू नये ? '

' कोणती उणीव ? '

' आम्ही सारे चार पायांच्या आधाराने खाली मान घालून चालणारे प्राणी आहोत. आमच्यात दोन खंबीर पायावर ताठ मानेने चालणारा प्राणी नाही, ही गोष्ट अखिल प्राणी मात्रास मान खाली घालावयास लावणारी आहे ! '

सिंहाच्या या तक्रारीवर सर्व पशूंनी संमतीदर्शक आवाज उठवले ..... ।

' होय, होय. नक्कीच ही शरमेची गोष्ट आहे ! '

पशूंची तक्रार ऐकून ब्रम्हदेवाने शांतपणे विचारले,

'तुमची इच्चा काय आहे ?'

'तू दोन पायांवर ताठ मानेनं चालणारा प्राणी तयार करावास.'

गाढवाचा प्रश्न ऐकताच निर्धारपूर्वक ब्रम्हदेव उद्गारला,

' ते कदापि शक्य नाही ! '

' मग आम्ही हा मोर्चाही कदापि उठवणार नाही, मेलो तरी हटणार नाही ! '

वाघाने फोडलेली डरकाळी ऐकून ब्रम्हदेव समजुतीच्या स्वरात म्हणाला,

' पशूनो, असा मूर्खपणा करू नका. तुम्हाला हवा असलेला प्राणी मी मुद्दामच तयार केलेला नाही. '

' का नाही केलास ? तो देवाशी स्पर्धा करील म्हणुन ? '

खिंकाळणाऱ्या घोड्याचा प्रश्न ऐकून मनावर शक्य तितका ताबा ठेवीत ब्रम्हदेव म्हणाला,

' असा प्राणी तुमच्या हिताचा नाही. तो तुम्हाला आपले

गुलाम बनवील. '

ब्रह्मदेवाच्या या विधानाची टर उडवीत एक माजलेला वळू फुत्कारला,

' हं ! म्हणे आम्हाला गुलाम वनवील ! काय बिशाद आलीय त्याची ! मी त्याला माझ्या अणुकुचीदार शिंगानी भोकसून टाकीन!'

वळूच्या विधानाला पुष्टी देत मदोन्मत्त हत्ती चित्कारला, 'मी त्याला सोंडेत पकडून गरागरा फिरवून आपटीन. पायाखाली चिरडून त्याचा चेंदामेंदा करीन !

हत्तीच्या विधानावर प्रत्येक प्राण्याने आपापल्या प्रतिक्रीया व्यक्त केल्या:

' मी त्याला नखाने फाडीन ! त्याच्या चिंधड्या उडवीन ! '

' मी लाथेने ठोकरीन ! '

' मी दातांने चापलीन ! '

' मी नुसती धडक देऊनच ठार करीन ! '

प्रत्येकाच्या प्रतिक्रिया ऐकून ब्रह्मदेव म्हणाला,

' तुम्ही काहीही केलेत तरी तो प्राणी तुम्हा सर्वांना पुरुन उरेल. त्यामुळे केवळ तुमच्या हितासाठीच मी तुम्हाला हवा असलेला नवा प्राणी तयार करु शकत नाही. '

ब्रह्मदेवाचा नकार ऐकून सर्व पशू चिडून उठले. हट्टाला पेटून सारे एका आवाजात गलका करीत ओरडले.

' आमचे हित–अहित आम्ही पाहून घेऊ तू त्याची चिंता करु नको. आम्हाला नवा प्राणी हवा आहे. तुला तो निर्माण करावाच लागेल, तू तो निर्माण केल्याखेरीज आम्ही तसूभरही मागे हटणार नाही. '

मी असा प्राणी तयार केल्यावर तुमचे आवाज कायमचे बंद होतील. मग तुम्हाला काहीच बोलता येणार नाही चालेल ? '

' चालेल ! चालेल ! '

पशूंचा एकमुखी निर्धार ऐकून नाईलाजाने ब्रह्मदेव म्हणाला,

ठीक आहे मी नवा प्राणी तयार करीन माझ्या कोठारात हाडा–मांसाचा साठा पुरेसा आहे. रक्तही पुरेसं आहे पण–'

' काय नाही ? '

' मेंदू '

ब्रह्मदेवाची समस्या ऐकताच उत्स्फूर्तपणे गाढव ओरडले,

' माझा सर्वच्या सर्व मेंदू घे, पण नवा प्राणी तयार कर '

' आमच्यातीलही थोडा मेंदू घे. नव्या प्राण्यासाठी आम्ही तो आनंदाने दान करायला तयार आहोत ! '

सर्व पशूंनी आपापल्या मेंदूचे दान केल्यावर ब्रह्मदेवाने दोन पायावर ताठ मानेने चालणारा नवा प्राणी तयार झालेला नवा प्राणी खूपच तल्लख बुद्धीचा झाला,

ब्रह्मदेवाने त्या प्राण्याचे नाव ठेवले– ' मानव प्राणी ! '

# पशूंचे संमेलन

एकदा एका निर्जन रानात पाळीव प्राण्याचे संमेलन भरले होते. ते भरविण्यात एका म्हाताऱ्या कुत्र्याचा पुढाकार होता. पाळीव पशूंच्या दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यासाठी ते संमेलन भरविले होते. त्यामुळे सर्व पाळीव पशू मोठ्या संख्येने सभेस उपस्थित राहिले होते. पाळीव पशूंच्या समस्या ऐकून त्या सोडविण्यासाठी एका सिंहाला अध्यक्ष म्हणून खास निमंत्रित केलें होते. त्या निमंत्रणाचा स्वीकार करुन सिंह सभा-स्थानी उपस्थित होताच सर्व पशूंनी गुडघे टेकून सिंहाला मान-वंदना दिली. मग अध्यक्षाच्या उच्चासनावर विराजमान होत सिंह म्हणाला, " उपस्थित बंधु–भगिनीनो, तुमच्या समस्या ऐकण्यासाठी व शक्य झाल्यास त्या सोडविण्याचे उपाय सुचवि–ण्यासाठी आज तुम्ही मला मोठ्या विश्वासानं निमंत्रण दिल्या–बद्दल प्रथम मी सर्वांचे आभार मानतो. आता तुम्ही निःसंकोच–पणे आपापल्या समस्या मांडाव्या. पाळीव प्राण्यामध्ये मोत्या कुत्रा आणि वाघाची मावशी मनी म्माऊ यांचा क्रम पहिला असल्या–मुळे प्रथम त्यानी आपल्या समस्या जाहिरपणे मांडाव्या. "

सिंहाने आवाहन करताच मोत्या शेपूट हलवत सर्वापुढे आला आणि म्हणाला, " मित्रहो, अध्यक्ष महाशयांनी सर्व पाळीव प्राण्यात मला प्रथम क्रमांक देऊन माझा मोठा गौरव केलेला

आहे, पण जीवनभर ज्या मनुष्य प्राण्याची मी इमाने इतबारे सेवा केली, तो मनुष्य प्राणी आता माझ्या उतार वयात माझी फार अवहेलना करीत आहे. हीच माझी खरी समस्या आहे. ' इमानी कुत्रा ' अशा शब्दात माझा गौरव करणारा मनुष्य प्राणी या म्हातारपणी माझ्याशी बेइमानी करतो. माझ्या खाण्यापिण्याची फिकीर न करता मला घराबाहेर हकलून देतो. हीच काय त्याची माणुसकी ?"

मोत्याच्या प्रश्नावर टूणकन उडी मारुन सर्व पाळीव पशूंसमोर येत मनी म्हणाली,

" बंधु–भगिनींनो, मोत्याने माणसाच्या माणुसकीचा उल्लेख केला म्हणून सांगते– माणूस आम्हाला पशू म्हणतो, पण आमच्यात जेवढी माणुसकी आहे; तेवढी माणुसकीचा टेंभा मिरवणाऱ्या त्या मनुष्य प्राण्यात निश्चितच नाही. माणूस म्हणजे ' कामापुरता मामा ' ' गरज सरो नि वैद्य मरो ' ही त्या स्वार्थी माणसाच्या वागण्याची रीत. बालपणी त्यानं मला दुधाची चटक लावली. माझ्याकडून उंदरांचा संहार करवून घेतला. आता मात्र तो माझी कसलीही काळजी घेत नाही. मला दुधाची सारखी चटक येते. मग मी माणसाचा डोळा चुकवून व स्वतःचे डोळे मिटून दूध पिऊ लागते. नेमक्या त्याचवेळी त्या दुष्ट माणसांचे डोळे माझ्यावर रोखले जातात आणि माझ्या पाठीत काठीचा असह्य प्रहार होतो. कधी कधी वरवंटा, सांडशी, फुंकणी, अशा सारख्या हाती लागेल त्या अवजड वस्तूंचा फटका बसतो. अशा या दुष्ट माणसाशी कसे वागावे तेच कळत नाही. "

मनीच्या विधानाला हंबरुन दुजोरा देत एक गाय म्हणाली,

" मनी मावशी, माझ्या बछड्याच्या तोंडचं दूध तोडणारा स्वार्थी मानव प्राणी तुला तरी माझं दूध कसं पिऊ देईल ? या मानवाला आम्ही गाई-म्हैशी दुधासारखं पूर्णान्न पुरवतो, पण शेवटी आम्ही थकून भाकड बनल्यावर हा मानव आमची रवानगी खाटिक खान्यात करतो. या निर्दयपणाला काय म्हणावं ? " " माणूस म्हणावं ! " असे तुच्छतेचे उद्‌गार काढून मानव प्राण्याच्या निषेधाची आरोळी ठोकत एका कोपऱ्यातील गाढव पुढे येऊन म्हणाले,

" मित्रहो, आजवर मनुष्य प्राण्याच्या पाळीव प्राण्यावरील अत्याचाराबाबत ओरडून मी तुम्हाला जाग आणण्याचा प्रयत्न करीत होतो, पण कुणीही गंभीरपणे माझ्या ओरडण्याकडं लक्ष दिलेलं नव्हतं. आयुष्यभर माझ्या पाठीवर दगडांच्या गोण्या वाहून माणसानं माझ्या पाठीचं धिरडं केलं तरी कुणाला माझी दया आली नाही. मला या गोष्टीचा खेद वाटत नाही. पण ' गाढव म्हणजे निर्बुद्ध प्राणी ' अशीच माणसानं ठाम समजूत करून घेतलेली आहे या गोष्टीचा मला अत्यंत खेद वाटतो आणि मनस्वी चीडही येते. "

गाढवाच्या विधानावर मान डोलवीत बैल म्हणाला. ' अरे बाबा, तुला कल्पनाही नसेल, पण ' न पटताही किंवा न कळ-ताही एखादा माणूस जेव्हा मान हलवतो ' तेव्हा त्याला बैल, बैलोबा किंवा नंदी बैलाची उपमा देतात. तेव्हा मला किती खेद वाटत असेल ! हाडाची काडं नि रक्ताचं पाणी करून मी माणसाची शेती पिकवतो. तरीही माणूस मला हीनच लेखतो. हाच का माणसाचा न्याय ? '

‘ अरे भाऊ, माणसाला न्यायाची चाड असती तर त्याला पौष्टीक दूध पुरविण्यास समर्थ असलेल्या गरीब शेळ्या–मेंढ्यांना केवळ आपल्या जिभेचे चोचले पुरविण्यासाठी त्यानं कापून खाल्लं असतं का ? ’

एकाशेळीच्या विधानांवर सर्वपाळीव प्राण्यांनी माना हलवून नकार दर्शविल्यावर संमेलनाचा सूत्रधार असलेला म्हातारा मोत्या कुत्रा सिंहाला उद्देशून म्हणाला,

‘ अध्यक्ष महाराज, सर्व पाळीव पशूंची दुरावस्था आता आपल्या ध्यानी आलीच असेल आमच्या या दुरावस्थेला मानव प्राणीच सर्वस्वी कसा जबाबदार आहे, ही गोष्टही चांगलीच ध्यानी आलीच असेल. तेव्हा या परिस्थितीतूनबाहेर पडून मानानं जगण्याचा मार्ग आपण दाखवावा अशी मी सर्व पाळीव पशूंच्या–वतीनं आपणास विनंती करतो. ’

मोत्याने विनंती करताच गर्जना करीत सिंह म्हणाला, माझ्या पशु–बांधवानो, तुमची ही दुर्दशा पाहून मला कीव येते आणि संतापही येतो. मानव तुम्हाला अत्यंत अपमानास्पद वागणूक देतो ही गोष्ट खरीच आहे. पण मी मानवाला दोष देणार नाही. खरे दोषी तुम्हीच आहात. अन्नासाठी लाचार होऊन तुम्ही मानवाचे गुलाम बनला आहात, गुलामाना स्वतःचं मन किंवा मत नसतं. मालकाच्या मर्जीनुसारच त्यानी वागायचं असतं. पोटासाठी लाचार होऊन तुम्ही तुमचं मौल्यवान स्वातंत्र्य हरवून बसला आहात. जगात कुणी कुणाला फुकट पोसत नसतं. दुस–ऱ्यांच्या अन्नावर पोसणाऱ्यांना अन्यायाविरूद्ध तक्रार करण्याचा काय अधिकार ? अंगात हिंमत असेल तर तुमचं अन्न तुम्ही स्वतः धडपडून मिळवा. स्वाभिमानाचं मुक्त जीवन जगायचं

असेल तर निर्भयपणे स्वतःला उघड्या जगात झोकून द्या. मनुष्य वस्ती ही तुमची दास्यभूमी आहे. निर्जन अरण्य हीच सर्व पशूंची मुक्तिभूमी आहे. मानवाच्या गुलामगिरीतून स्वतःची मुक्तता व्हावी, अशी ज्यांची मनापासून इच्छा असेल, त्या पशूंनी माझ्या मागून अरण्यात यावे. '

सर्व पाळीव पशूंना आपल्या मागून अरण्यात येण्याचे आवाहन करून सिंह अरण्याच्या दिशेने वाटचाल करू लागला, पण एकही पाळीव पशू त्याच्या मागून जाण्यास धजावला नाही. प्रत्येकाला आयते खाण्याची सवय असल्यामुळे स्वतः धडपडून स्वतःचे अन्न मिळविण्यात यशस्वी होण्याचा आणि सुरक्षित जीवन जगण्याचा आत्मविश्वास त्यांच्यात नव्हता. त्यामुळेच सिंहामागून अरण्यात जाण्याचे त्याना धाडस होत नव्हते,

बरेच अंतर चालून गेल्यावर सिंहाने मागे वळून पाहिले. एकही पाळीव पशू त्याच्या मागून येत नसल्याचे पाहताच क्रोधायमान होत तो उद्गारला,

' अरे ऐतखाऊ भेकडांनो ! गुलामगिरीत खितपत पडण्यासाठीच तुम्ही जन्मला आहात ! सन्मानाचं मुक्त जीवन जगणं तुम्हाला कदापि शक्य नाही ! तुमच्या सारख्या भ्याडांच्या संमेलनाचा मी अध्यक्ष झालो या गोष्टीचा मला मनस्वी खेद वाटतो, आता माझ्या समोरून चालते व्हा. अन्यथा ऐकेकाचा फन्ना उडवीन ! '

संतप्त झालेल्या सिंहाने कानठळ्या बसविणारी प्रचंड गर्जना केली आणि दुसऱ्याच क्षणी जीव वाचविण्यासाठी सर्व पाळीव पशू मनुष्य वस्तीच्या दिशेने सुसाट धावत सुटले.

BVBK-0402416